# Golden Jubilee Reunion

# 50

## MODERN B.Com. 1970-74




Jan 2, 2022


The Principals (1970 – 2019)
Prof. M. B. Limaye
Dr. L. H. Gadgil
Prof. S. Y. Gambhir
Dr. S. N. Navalgundkar
Prof. P. S. Chirputkar
Dr. S. N. Navalgundkar
Prof. S. Y. Gambhir
Dr. S. Y. Paranjape
Prof. P. S. Chirputkar
Dr. P. D. Apte
Prof. A. G. Gosavi
Dr. R. S. Zunjarrao


PROGRESSIVE MODERN
Best College Award by SPPU (2008)
Best College award (NSS) by SPPU (2014)
Best Principal award by SPPU (2014)
Best Accessible Website by Ministry of Social Justice and Empowerment (2018)
'A+' Grade with CGPA 3.51 by NAAC (2017)
॥ ज्ञानमयो भव ॥
1934
EXCELSIOR
Autonomous Status by UGC (2019)
Award as Mentor Institution under 'Paramarsh' Scheme by UGC (2019)
International Collaborations : UoM, Australia; PASCH, DAAD, Germany
ISO 9001: 2008 Certification (2015)
UGC-BSR Scheme (2012)
DST-FIST Schemes (2013)
DST-FIST Schemes (2018)
Best College award (Sports) by SPPU (2019)
M.Voc. Scheme by UGC (2019)
CPE status by UGC New Delhi ( 2017)
CPE status by UGC New Delhi (2011)
Star College Scheme by DBT, Govt. of India (2013)
Best College award (Sports) by SPPU (2018)
B.Voc. (Fashion Technology and Apparel Designing) (2018)
Community College Scheme by UGC (2015)
Best College award (Sports) by SPPU (2017)
B.Voc. Scheme by UGC for 2 Programs (2019)
Best College Award (Sports) by SPPU (2016)
B.Voc. Scheme by UGC, (2018)
Progressive Education Society's
Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous)
Shivajinagar Pune-5

# अर्पणपत्रिका

मॉडर्न कॉलेज बी.कॉम. बॅच (१९७० ते ७४) च्या
आम्हा विद्यार्थ्यांना उत्तम माणूस म्हणून घडविण्यासाठी
ज्यांनी भक्कम पाया घातला, आम्हांला शिक्षणाबरोबर,
देश दुनियेची ओळख करून दिली आणि आयुष्याला
समर्थपणे तोंड देण्याची शिकवण दिली त्या आमच्या
शिक्षक व शिक्षिकांना व अर्थातच मॉर्डन कॉलेजला
स्मरणिका कृतज्ञतापूर्वक अर्पण.




या स्मरणिकेतील लेखांमधील मते ही त्या लेखकांची असून त्यास संपादक मंडळाची सहमती असेलच असे नाही.

# संपादकीय

## गौरवशाली सुवर्णमहोत्सव

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या संस्थापक व धुरिणांनी जे स्वप्न पाहिले आणि त्यासाठी बीजारोपण केले, ते स्वप्न संस्थेच्या प्रदीर्घ परिश्रमांमुळे, केवळ रूजलेच नाही, तर त्याचे रोपटे चांगलेच फोफावले. 'मॉडर्न कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स' शिवाजीनगर, पुणे या महाविद्यालयाच्या रूपाने त्याचे वटवृक्षात रूपांतर झाले आणि आता या वटवृक्षाच्या पारंब्यातून फुललेल्या – वाढलेल्या नववटवृक्षांनाही स्वायत्ततेची स्वप्ने साकार होण्याची आशा निर्माण झाली आहे. अशा या वटवृक्षाची प्रारंभीची कोवळीक होण्याचे भाग्य लाभलेले आम्ही या मॉडर्न महाविद्यालयाच्या पहिल्या म्हणजे १९७० ते १९७४ च्या कॉमर्सच्या बॅचचे विद्यार्थी महाविद्यालयासोबतच पन्नास वर्षे पूर्ण करून हे सुवर्ण महोत्सवी वर्ष अत्यंत आनंदाने साजरे करत आहेत, आणि त्या निमित्तच ही स्मरणिका प्रकाशित होत आहे. ही केवळ आनंदाचीच बाब नाही तर त्यामुळे एक दस्तऐवजी घबाड देत आहे, याचा आम्हाला अभिमानही आहे. महाविद्यालयाच्या पहिल्याच वर्षी एक अतिशय बोजड यंत्र मोबाईल म्हणून लांबून पाहायला मिळाले होते. आज ती प्रत्येकाच्या खिशाची अविभाज्य बाब बनली आहे. या मोबाईलमुळेच व्हॉटस्ॲपच्या माध्यमातून आम्ही तेव्हांचे वर्गमित्र एकमेकांशी जोडले गेलो आणि त्यातूनच आम्ही सर्वांच्या एका दिवसाच्या मेळाव्याची व स्मरणिकेची कल्पना सुचली. वर्गमित्र उत्साहमूर्ती (प्रा.) शाम वाघ यांच्या पुढाकाराने कल्पनांना पंख फुटले आणि मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव तसेच उपप्राचार्य, प्राध्यापक, वाचनालयातील अधिकारी वर्गच नव्हे तर महाविद्यालयाशी संबंधित सर्वांनी देऊ केलेल्या सहकार्यामुळेच हा दिवस आणि ही स्मरणिका आज आपल्याला पाहायला

मिळत आहे. 'हे नवे महाविद्यालय काय मोठे दिवे लावणार आहे?' असे कुत्सित प्रश्न त्यावेळी विचारणारेही आज ज्या दिव्यांच्या उजेडाने दिपून गेलेले पाहायला मिळतात, ही सूर्यप्रकाशाइतकी स्वच्छ बाब बनण्याचे आम्हा सहाध्यायींना 'याचि देही याचि डोळा' पाहायला मिळाले हे वास्तव कोणीही नाकारू शकणार नाही. आज एकही क्षेत्र असे नाही की मॉडर्नच्या विद्यार्थ्यांना तेथे अत्युच्च किंवा तत्सम स्थान मिळाले नसेल.

शाळेत आयुष्याचा पाया घातला जातो आणि महाविद्यालयात आयुष्याच्या इमारतीच्या भिंती उभ्या राहू लागतात. मॉडर्न महाविद्यालयाने या भिंती तर उभ्या केल्याच, पण त्या भिंतीवर छप्पर चढवण्याचीही व्यवस्था केली. आमचे एक सहाध्यायी चंदू गोडबोले त्यांच्या लेखात म्हणतात, त्याप्रमाणे त्यावेळी एसेम जोशी यांच्यासारख्या मोठ्या माणसालाही इतके पदवीधर निर्माण झाले तर त्या सर्वांना नोकरी व्यवसाय कसे मिळणार, असा प्रश्न पडला होता; पण आमचा एकही सहाध्यायी बेकार राहिला नाही, ही वस्तुस्थितीच खूप बोलकी आहे. आजही परिस्थिती अशी आहे की विद्यार्थ्यांना आत्मनिर्भर होऊन इतरांना आत्मनिर्भरतेसाठी मदत करता येण्याची उमेद हवी. सुवर्णमहोत्सवी वर्षानंतर हे नवे आव्हान पेलण्यास आमचे मॉडर्न महाविद्यालय समर्थ बनेल, असा आम्हाला विश्वास आहे, एवढेच नव्हे, तर त्यासाठी महाविद्यालयाला मदत करण्यासाठी आमच्यापैकी प्रत्येक जण या ना त्या रितीने हातभार लावण्यास इच्छुक आहे. आणखी काय हवे? मॉडर्न महाविद्यालय सुवर्ण महोत्सवाकडून हिरक महोत्सवाकडे आणि नंतर शतक महोत्सवाकडेही गौरवशाली वाटचाल करेल. असा आम्हाला विश्वास आहे. आमची मैत्री व महाविद्यालयाची प्रगती उत्तरोत्तर बहरतच जाईल याची खात्री वाटते.

**सुरेशचंद्र पाध्ये**

## १९७० संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालयाचा प्राध्यापकवर्ग व विद्यार्थि–प्रतिनिधी



डावीकडून (बसलेले) : प्रा. आपटे, प्रा. गंभीर, ए.जी. मायदेव, डॉ. भावे, प्रा. न.गो. सुरू, वसंतराव वैद्य
प्राचार्य लिमये, श्री. ताटके, डॉ. गाडगीळ, प्रा. कुलकर्णी
मागे उभे : कु. बेंद्रे, कु.पारखी, प्रा. धायगुडे, प्रा. मिजार, प्रा. नातू, प्रा. संगोराम, श्री. सिधये, डॉ. परांजपे,
प्रा. रायकर, प्रा. चिरपुटकर, कु. ममदापूरकर, कु. मेहता
अगदी मागे उभे : घाटगे, नायडू, तांबे, महापुरे, शानभाग, जैन, पाठक, गाजरे, गायकवाड, लागू, पटवर्धन,
राऊळ, जोशी, चिटणीस.



वसंतराव वैद्य व सौ. जयश्री वैद्य यांच्या हस्ते
महाविद्यालयाच्या इमारतीचे भूमिपूजन



प्राचार्य लिमये सर, ताटके सर १९७०–७१ च्या
एका कार्यक्रमात

# प्रि. मो. भा. लिमये उवाच

पुण्याच्या मॉर्डन महाविद्यालयाला (कला-शास्त्र-वाणिज्य स्थापना १७-६-१९७०) पन्नास (५०) वर्षे पुर्ण झाली त्यानिमित्ताने त्या महाविद्यालयातील पहिल्या पी.डी. बी.कॉमच्या तुकडीतील विद्यार्थ्यांनी (१९७०-१९७१) आयोजित स्नेह-संमेलनानिमित्ताने माझ्या काही आठवणी.
सर, तुम्ही तुमच्या कांही आठवणी लिहून पाठवाल का अशी विनंती केली गेली. काही विद्यार्थी विद्यार्थीनी तर मी प्रत्यक्ष उपस्थित राहावे अशी इच्छा प्रदर्शित केली होती पण वयानुसार (वय ८९) ते शक्य होणार नाही हे मी कळविल्यावर आठवणींचा आग्रह झाला आणि तो मला मान्य करावा लागला.
आठवणी तर अनंत आहेत. नऊ वर्षाच्या काळांत (१९७०-१९७९) हजारो विद्यार्थ्यांचा सहवास लाभला. प्रत्येक विद्यार्थ्याला कमीत कमी एकदा तरी (ओळख पत्रावर माझी सही घेतांना) माझ्या समोर उभे रहावे लागत असे. ज्या वर्गांना मी शिकवत होतो, त्या विद्यार्थ्यांशी माझा सहवास अनेक वर्षाचा होता. त्याचबरोबर कला आणि शास्त्र शाखांच्या विद्यार्थ्यांशी त्यांना ऑफ-तास असेल तर अगर प्रयोगशाळेत ते काम करत असतील तर त्या काळांत मी तेथे भेट देऊन संवाद व विचारपूस करीत असे. तास चुकवून मैदानावर भटकणाऱ्या विद्यार्थ्यांशी तर नेहमीच मुलाखत होत असे. परंतु हे प्रमाण कमी होते कारण सर्व तास झालेच पाहिजेत याची दक्षता मी घेत असे आणि तास ऑफ असेल आणि मला वेळ असेल तर त्या वर्गावर जाऊन मी विद्यार्थ्यांशी संवाद साधत असे. मी काय केले काय करत होतो याबद्दल एवढेच पुरे.
मी आठवणी मुख्यत: माझ्या विद्यार्थ्यांच्याबद्दल लिहावयाच्या आहेत.
माझे अहो भाग्य की मला सर्व विद्यार्थी चांगलेच भेटले. विद्यार्थ्यांसंबंधी नाराजी व्यक्त करण्याचे प्रसंग फारच क्वचित आले.
आठवणी संबंधी लिहिण्या अगोदर हे ही लिहिणे आवश्यक आहे की मला प्राचार्य म्हणून काम करीत असताना लाभलेले सहकारी (प्राध्यापक व इतर कर्मचारी) चांगले होते. त्यांचे मला संपूर्ण सहकार्य लाभले. त्यापैकी काही आज हयात नाहीत अशांना श्रद्धांजली अर्पण करतो आणि त्या सर्वांविषयी आदर, प्रेम, कृतज्ञता व्यक्त करतो.
मला लाभलेले सर्वच्या सर्व विद्यार्थी चांगले होते. कर्तव्यदक्ष होते. प्रामाणिक होते, शिक्षकांबद्दल प्रेम, आदर दर्शविणारे होते. चुका झाल्या तर त्या मान्य करून सुधारणा करण्याची क्षमता व इच्छा असलेले होते. माझ्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे देखील मला सहकार्य लाभले आहे. आठवणी अनेक आहेत. परंतु त्यापैकी काहींचा उल्लेख करतो.

१.

सटाणा येथील एक शैक्षणिक संस्थेत व्याख्यान देण्यासाठी मी गेलो असता एक मध्यमवयीन गृहस्थ माझी वाट पाहत होते ते मला भेटले. मला त्यांनी त्यांच्या शेतावर मळ्यावर संध्याकाळी भोजनासाठी आमंत्रित केले. त्यांनी ते माझे १ वर्षापुरते विद्यार्थी असल्याचे सांगितले. त्यांच्याकडे गेल्यावर मी चौकशी केली. त्यांनी सांगितले, ''सर मी एकच वर्षे कॉलेजमध्ये शिक्षणासाठी होतो. पुढे घरच्या शेतीमध्ये मला लक्ष घालावे लागले. पण तुम्हांला भेटण्याची फार इच्छा होती. सर तुम्ही आम्हाला शिकवायला होता आणि तुमच्या पद्धतीप्रमाणे तुम्ही विद्यार्थ्यांच्या बाकांमधून फेरी मारून कोण काय लिहितो आहे वैगरे पाहत असत चौकशी करीत असत. माझ्या बाकांजवळ आल्यावर तुम्ही माझ्या पाठीवरून हात फिरवुन तुझे छान अक्षर आहे आणि जे लिहिले ते बरोबर लिहिले आहेस म्हणून तुम्ही माझे कौतुक केले. त्या दिवशी मला आणि माझ्या घरच्यांना किती आनंद झाला हे सांगताच येत नाही.

२.

एकदा विद्यापीठाच्या कामासाठी मला मालेगावला जावयाचे होते. एस.टी. चे रिझर्व्हेशन केले होते. मी जाण्यासाठी शिवाजीनगर बस स्थानकावर आलो आणि पाहिले कि त्या एस.टी. बसमध्ये माझ्या रिझर्व्हड सीटवर एक तरुण बसला आहे. नेहमीच्या पद्धतीनुसार मी त्याला हटकणार तेवढ्यांत तो उठला मला त्याने वाकून नमस्कार केला आणि म्हणाला तुमचे नाव पाहिले आणि तुम्हांला भेटावे म्हणुन तुमच्या जागेवर येऊन बसलो. सर आज फार बरं वाटलं.

३.

एकदा पुणे विद्यापीठांत स्कुटरवरून मिटींगला निघालो असता, ॲग्रीकल्चरल कॉलेज जवळच्या पेट्रोल पंपावर पेट्रोल घेण्यासाठी रांगेत उभा होतो. पेट्रोल भरणाऱ्या कर्मचाऱ्याने पाहिले; धांवत जवळ आला; नमस्कार केला. ''म्हणाला, मी तुमचा विद्यार्थी त्याने विचारपूस केली. पेट्रोल भरले. फडक्याने गाडी पुसली हवा चेक केली.''

४.

मी प्राचार्यपद सोडल्यानंतर व्यवस्थापन सल्लागार कंपनीत अधिकारी म्हणुन कार्यरत होतो. दुपारच्या लंच नंतर इतर सहकार्याबरोबर जवळच्या पानाच्या ठेल्यापर्यंत त्यांच्या बरोबर जात असे मी नियमित पान खात नाही. अगर सिगरेट वैगरेही नाही. संध्याकाळी माझ्या घरी एक (माझाच आधीचा) विद्यार्थी आला आणि मला म्हणाला, ''सर आमचे प्राचार्य म्हणून आमच्या मनात तुमची एक प्रतिमा आहे. तुम्ही चट्या पट्याचा शर्ट घालुन पानाच्या ठेल्यावर

उभे ही प्रतिमा फार त्रास देऊन गेली. मी त्यावर विचार केला. मला त्यांत तथ्य वाटले आणि माझ्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला.

५

माझा एक विद्यार्थी मला नेहमी फोन करत असे. मी त्याला सांगितले फोनच्या ऐवजी तू मला पत्र लिही ते पुन: पुन: वाचता येते. मला जास्त आनंद होईल. त्याने पत्र लिहिले सर तुम्ही प्राचार्य असताना एक गॅदरींगच्या वेळी तुमची मुले विविध गुणदर्शन कार्यक्रमाला आली होती. परंतु त्यानंतरच्या अल्पोपहारासाठी ती थांबली नाहीत. घरी गेली या गोष्टीची माझ्या मनात नोंद झाली. माझा तुमच्याबद्दलचा आदर वाढला.

६

मी माझ्या व्यवस्थापन सल्लागार कंपनीतील एक अधिकारी या नात्याने कामानिमित्त बेंगरूळूला गेलो होतो. माझ्या निवासस्थानाजवळील एका हॉटेलमध्ये मी सकाळचा नाष्टा घेत होतो. काही अंतरावरच्या एका टेबलवर एक तरूण बसला होता. मी त्याला ओळखले. मॉडर्न महाविद्यालयातील शास्त्र शाखेचा तो विद्यार्थी होता. महाविद्यालयातील प्रथेप्रमाणे सर्व बाबतीत असमाधानकारक प्रगति या कारणास्तव त्याला परिक्षेचा फॉर्म नामंजूर करून परत घेतला होता. मला वाटलं, त्याच्याकडे न पहाता त्याला चुकवून आपण येथून बाहेर पडावे. मी निघालो तो उठला माझ्याजवळ आला मला म्हणाला लिमये सर ना ! मी तुमचा विद्यार्थी. तुम्ही घरी आत्ता वेळ असेल तर आलेच पाहिजे. तुमच्यासाठी एक सरप्राईझ आहे. मी मनांत थोडा धास्तावलो परंतु म्हटले चला काय होते ते पहावे. त्याच्या घरी गेलो त्याची बायको समोर आली तिने नमस्कार केला ती ही मॉडर्नची विद्यार्थीनी होती. तो म्हणाला, ''सर तुम्ही जे केले ते बरोबरच होते. मला तो कोर्स (शास्त्र शाखेचा) आवडत नव्हता. वडिलांच्या धाकापायी मला तो जॉईन करावा लागला. आता मी माझ्या आवडीचे क्षेत्र निवडले आहे. माझा बिझनेस आहे आणि मी सुखी आणि आनंदी आहे. तुमच्याबद्दल राग नाही, आदर आहे.

७.

असाच एक शास्त्र शाखेचा विद्यार्थी त्याचा Form पर घेतला होता. आपल्या पध्दतीप्रमाणे असमाधानकारक प्रगति असलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना पत्रे पाठवून आपण याची कल्पना वेळोवेळी देत होतो. त्याचे वडील एक इंजिनियर होते. ते मला भेटांवयास आले मी त्यांना वस्तुस्थिती सांगायला सुरूवात केली. परंतु त्यांनी मला थांबवले आणि मला म्हणाले सर तुम्ही जे केलेत ते बरोबरच केले आहे. परंतु मी एक विनंती करतो माझ्या पाल्याला कृपया पुढील वर्षी तुमच्याच महाविद्यालयांत प्रवेश द्यावा. मी मान्य केले त्याला प्रवेश दिला.

८

कंपनीच्या कामासाठी मी लखनौला गेलो होतो. तेथील एका संघटनेसाठी आम्ही व्यवस्थापन सल्लागार म्हणुन काम केले होते. केलेल्या कामाचे बील घेण्यासाठी मी गेलो होतो. संबंधित अधिकाऱ्याच्या कक्षांत मी गेलो. ते अधिकारी उठून उभे राहिले. मला नमस्कार केला. माझे ते विद्यार्थी असल्याचे सांगितले अर्थात आमचे काम ताबडतोब झाले.

९.

गोव्यामधील एका मॅनेजमेंट इंस्टिट्यूट (M.B.A.) मध्ये मी संचालक (Director) होतो. तेथील एका बँकेमध्ये मी कामानिमित्त गेलो. एक अधिकारी धावत आले म्हणाले, "मी तुमचा विद्यार्थी." गोव्याच्या माझ्या वास्तव्यांत सर्व तऱ्हेने त्यांनी मला न सांगता मदत केली.

१०

माझ्या कामाच्या पध्दतीप्रमाणे प्राचार्य म्हणून फावल्या वेळात मी सर्व विद्यार्थ्यांचे ॲडमिशन फॉर्म पाहून त्यांचे वर्गीकरण करीत असे. पालक, डॉक्टर, वकील, शिक्षक, इंजिनियर, व्यापारी, वैद्य, भिक्षुक-ज्योतिषी इत्यादी त्याआधारे गरजू विद्यार्थ्यांना पुस्तकांचे संच अगर फीमध्ये सवलत मदत देत असे. एका विद्यार्थ्याने तो पुण्यातील एका हॉटेलमध्ये रात्रीपाळीला काम करतो असे लिहिले होते त्याला बोलावून चौकशी केली. त्याला शिक्षणात मदतीचा हात दिला.

विद्यार्थी मित्रानो तुमच्या बद्दलच्या आठवणी खूप आहेत आणि त्या सर्व चांगल्या आहेत. उपयुक्त आहेत. उपयोगी आहेत. परंतु कोठेतरी थांबलेच पाहिजे. म्हणुन पुढील दोन आठवणींचा उल्लेख करून थांबतो.

११

आपल्या एका विद्यार्थ्याचा रद्दी विकण्याचा उद्योग होता. तो माझ्याकडे आला आणि म्हणाला 'सर, रोज महाविद्यालयांत खूप रद्दी कागद गोळा होतात. महाविद्यालयाच्या सुरूवातीच्या काळांत तर खूपच. ही सर्व सर्व साठवून ठेवली गेली तर मी ती विकत घेईन. कर्मचाऱ्यांना आणि विद्यार्थ्यांना आवाहन केले. रोजच्या रोज रद्दी गोळा करून वेगळी ठेवली गेली त्याचे त्या काळांत (१९७१-७२) रु. १०००/- आले. ती रक्कम Students Aid Fund and Class IV servants Aid Fund यांत जमा करून त्याचा उपयोग केला गेला.

१२

१९७०-७१ या महाविद्यालयाचा पहिल्यांच वर्षी सकाळच्या सत्रांत प्राचार्य म्हणुन माझ्याकडे तक्रार आली की एक वर्गातील एका विद्यार्थ्याची किंमती वस्तु (पैसे/दागिने) चोरली गेली आहे. मी ताबडतोब त्या वर्गावर गेलो. सर्व विद्यार्थी जागेवर बसले. दोन कर्मचाऱ्यांना बाहेर

जावयाच्या दरवाजाजवळ उभे केले आणि विद्यार्थ्यांना आवाहन केले. ज्या कोणी ही वस्तु किंवा पैसे घेतले असतील त्याने ताबडतोब मान्य करून माझ्या समोर हजर करावे आणि जोपर्यंत हे होत नाही तोपर्यंत वर्गातील एकालाही बाहेर जाता येणार नाही आणि मी ही येथेच बसून राहीन. माझा तुम्हा विद्यार्थ्यांच्या सद्सद्विवेक बुध्दीवर विश्वास आहे. दुपार होवो, संध्याकाळ-रात्र होवो आपण येथून हलणार नाही. साधारणत: एक तासाने एक विद्यार्थी ओक्साबोक्शी रडत समोर आला. वस्तु परत केली त्याला आम्ही सर्वांनी क्षमा केली. माझ्यासकट सर्वांचे डोळे पाणावले होते. आम्ही सर्वजण समाधानाने आणि आनंदाने वर्गातून बाहेर आलो.

मित्रांनो (तुम्ही सर्वजण एकेकाळचे माझे विद्यार्थी) आज तुम्ही साधारणत: वयाच्या ६५ ते ७५ या गटांत असाल. तुम्हांला एकत्र यावेसे वाटले. माझेशी बोलावेसे वाटले. महाविद्यालयांत यावे असे वाटले यांतच तुमचा चांगुलपणा. तुमचे महाविद्यालयावरील प्रेम, आदर, आत्मीयता दिसून आली. मला फार फार आनंद वाटला. जेथे असाल तेथे तुमच्या कुटुंबियास सुखांत, आनंदात आणि समाधानांत राहा ही ईश्वरचरणी प्रार्थना.

विद्यार्थी मित्रांनो,

तुमच्या बद्दलच्या माझ्या १२ आठवणी मी तुमच्याकडे पाठविल्या त्या तुम्हांला आवडल्या आणि आणखी आठवणी पाठवा असा तुम्ही आग्रह धरला. म्हणुन हा लेखन प्रपंच.

पाठविलेल्या आठवणीमध्ये एक सुत्र होते. ते म्हणजे मी (प्राचार्य) म्हणुन काय केले न केले पेक्षा तुम्हां विद्यार्थ्यांच जी चमक जो उत्साह जे गुण मला भावले त्या विषयी त्या आठवणी होत्या. तुम्ही देखील मान्य कराल किं तुम्ही सर्व चांगले होता, गुणी होता आणि आहातच आणि मला तुमच्याकडून भरपूर प्रेम, आदर व सहकार्य मिळाले आहे.

आता ज्या आठवणी मी लिहुन पाठवत आहे त्यात तुम्ही आहांतच मी पण आहे परंतु त्याचबरोबर महाविद्यालयाची व्यवस्थापन समिती (Management) सहकारी प्राध्यापक वर्ग कर्मचारी आणि पालक मंडळींचाही सहभाग आहे.

आठवणी लिहित असतांना सर्व काही साधे सुधे सरळ होते असे नाही. त्याबद्दलच्या पुढील २-३ आठवणी

१.

१९७०. महाविद्यालय सुरू करण्यापूर्वी एस.एस.सी. चा निकाल लागल्यावर मॉडर्न हायस्कुल मधील एक विद्यार्थी बोर्डात ७ वा आला होता. संस्थेचे चिटणीस श्री. ताटके सर व मी पेढे, कॉलेजचे माहितीपत्रक (Prospectus) व प्रवेश अर्ज (Admission Form) घेऊन त्याच्या घरी गेलो. त्याचे अभिनंदन केले आणि त्याला आणि त्याच्या पालकांना आपल्याच कॉलेजमध्ये

प्रवेश घेण्यासंबंधी विनंती केली. त्याने त्याप्रमाणे प्रवेश घेतला. पहिला प्रवेश म्हणुन त्याचा फोटो घेऊन आम्ही कौतुक केले. परंतु काही दिवसांतच कॉलेज सुरू होण्यापूर्वी त्याने प्रवेश रद्द करून दुसरीकडे प्रवेश घेतला. आपल्या कॉलेजच्या प्रवेशावर त्याचा कोणताच इष्ट अनिष्ट परिणाम झाला नाही. पण हे जे घडले ते बरे वाटले नाही !

आपलं कॉलेज भक्कम पायावर उभे होते ते व्यवस्थित सुरू झाले. पहिले वर्ष संपले (१९७०-७१) आणि विद्यापीठाच्या प्री-डिग्री कला शाखा वाणिज्य निकाल हाती आले. प्री-डिग्री कला शाखेत विद्यापीठात पहिली (First) विद्यार्थीनी आपली कु. हेमा लेले ही होती प्री-डिग्री वाणिज्य विभागांत विद्यापीठाच्या पहिल्या १० मध्ये आपले तीन विद्यार्थी कु. प्रतिभा कान्हेरे तिसऱ्या स्थानावर, श्री. शाम वाघ ४ था. पुण्यातील महाविद्यालयीन जगतात खळबळ माजली. सांप्रति हा कोणता नवा अवतार ! १९७१-७२ आपल्याकडे प्रवेशासाठी खूप गर्दी. त्या मॉडर्न हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे काही पालक शिक्षक मॉडर्न हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना अग्रक्रमाने प्रवेश मिळाला पाहिजे असे म्हणू लागले. मी मनांत म्हटले गेल्या वर्षी (१९७०-७१) आपल्याला असे कां वाटले नाही. उघडपणे मी त्यांना सांगितले; जरूर पण (On Merit) गुणानुक्रमे. कारण गेल्यावर्षी पुणे परिसरांतील पिंपरी चिंचवड भागातील विद्यार्थ्यांनी आपल्याकडे फार मोठ्या प्रमाणांत प्रवेश घेतला होता. महाराष्ट्रातील इतर भागांतूनही विद्यार्थी आपल्या कॉलेजमध्ये आले होते.

२.

कॉलेज सुरु होऊन २-३ महिने झाले एके दिवशी सकाळचे सत्र सुरू होण्यापूर्वी कर्मचारी (शिपायाने) मला सांगितले, ''सर विद्यार्थी बाहेर उभे आहेत वर्गात येत नाही म्हणतात.'' मी बाहेर जाऊन पाहिले तो कॉलेज समोरच्या जागेत दाटीवाटीने २००-३०० विद्यार्थी उभे आणि त्यांचा म्होरक्या (आपलाचं एक विद्यार्थी) त्यांने मागे उभारून चिथावणी देत होता. मी विद्यार्थी उभे होते तिकडे जावयांस सुरूवात केली ते मागे मागे जाऊ लागले. मी त्यांना थांबविले. बाहेर रस्त्यावर समोरील पोलीस वसाहतीतील लोकांची व इतरांची गर्दी. मी विद्यार्थ्यांना आवाहन केले, ''मी तुमचा प्राचार्य तुमच्याजवळ येत आहे. मागे कुठे जाता तुमची काही अडचण असेल. प्रॉब्लेम असेल. तर चला; आपण असे रस्त्यावर नको एका वर्गात बसूया. मला सांगा. योग्य असेल तर ते प्रश्न सोडवले जातील. काही विद्यार्थ्यांना नावाने हाक मारून वर्गात बसण्यास सांगितले थोडी चलविचल झाली. एक एक बाहेर पडून महाविद्यालयाकडे यावयांस लागले. सगळेच मग आंत आले. एका वर्गात त्यांना बसविले. त्यांच्या अडचणी समजावून घेतल्या. त्या सर्व सोडविल्या आणि महाविद्यालयाचे कामकाज सुरळीत चालू झाले.

तो म्होरक्या (मला नंतर समजले की तो दुसऱ्या एका महाविद्यालयांतून काढलेला विद्यार्थी होता.) नंतर मला कधी भेटला नाही, आढळला नाही, अशा करतो कि तो सुधारला असेल देव त्याचे भले करो.

३

एके दिवशी दुपारचे शास्त्र विभागाचे सत्र सुरू होण्याच्या वेळी मला शिपायांनी सांगितले कि प्रवेश द्वाराजवळ एक राजकीय पुढारी विद्यार्थ्यांना अडवुन त्यांच्या मोर्चात सामील करून घेण्याचा प्रयत्न करीत आहे. मी तेथे गेलो. त्या पुढाऱ्याला विचारले. त्याने सांगितले की शास्त्र शाखेच्या विद्यार्थ्यांशी संबंधित कांही तरतुदींच्या विरोधांत हा मोर्चा आहे. पुढाऱ्याला सांगितले, ''महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराच्या बाहेर उभे रहा आणि विद्यार्थ्यांना कांही सांगायचे ते सांगा. मी प्राचार्य म्हणुन येथे प्रवेश द्वारांत उभा राहून माझ्या विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन करीन. मी विद्यार्थ्यांना सांगितले, ''तुमचा जो कांही प्रश्न किंवा अडचण असेल ती योग्य असल्यांस मी स्वत: विद्यापीठांत चौकशी करून मार्ग काढीन आणि जर तुम्हाला तरीही मोर्चात जावयाचे असेल तर जा.'' पण मग शेवटपर्यंत तुम्ही त्या मोर्चात असले पाहिजे. मी तुम्ही शेवटपर्यंत त्यांत आहांत अगर नाही हे पाहीन आणि मग तुमच्यावर योग्य ती कारवाई करीन. सर्व विद्यार्थी महाविद्यालयांत आले व आपल्या आपल्या वर्गात गेले. त्या पुढाऱ्याच्या काही सहकाऱ्यांनी जाता जाता दुरून कॉलेजच्या इमारतीवर दगड फेकले. काही खिडक्यांची कांचेची तावदाने फोडली.

४.

एकदां सुट्टीच्या दिवशी सर्व प्राध्यापकांना काहीं महत्त्वाच्या कामासाठी कॉलेजमध्ये बोलावले. ते आले त्यांनी काम पूर्ण केले. पुढे २-३ दिवसांनी स्त्री प्राध्यापिकांमध्ये नाराजी असल्याचे मला कळले आणि त्या तक्रार घेऊन माझ्याकडे येणार असल्याचे कळले. मला आधी सूचना देऊन सर्व स्त्री प्राध्यापक माझ्या कक्षांत आल्या. त्यांना 'या बसा', वगैरे झाल्यानंतर मीच त्यांना सांगायला सुरूवात केली, माझेच चुकले की, सण असलेल्या सुट्टीच्या दिवशी कुटुंबाची जबाबदारी असलेल्या स्त्री-प्राध्यापकांना मी बोलवायला नको होते. यापुढे मी दक्षता घेईन. त्यांचे समाधान झाले. कोणी कांही बोलले नाही माझे आभार मानून हसत मुखाने त्या गेल्या.

तुमच्या लक्षांत असेल नसेल. पहिल्या वर्षी आपण श्री गणपतीची स्थापना केली होती आणि त्याचे विसर्जन मिरवणुकीत मी सामील होऊन हातांत लेझिम घेऊन खेळलो होतो. भाग घेतला होता.

आपल्या या महाविद्यालयांत प्रो.ए. सोसायटीची महाविद्यालय व्यवस्थापन समिती

(Management), मी प्राचार्य माझे सहकारी प्राध्यापक आणि कर्मचारी विद्यार्थी प्रतिनिधी आणि तुम्ही सर्व विद्यार्थी यांच्या सहकार्याने मदतीने आपण विद्यार्थ्यांचे शिक्षण प्रगति, उन्नति आणि प्रोत्साहन यासाठी खालील उपक्रमांत हाती घेऊन ते यशस्वी करण्याचा प्रयत्न केला आहे.

A

महाविद्यालयांत प्रवेशद्वाराजवळच सहकारी भांडार ज्यांत विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य विकत मिळेल अशी व्यवस्था आणि तेथे काम करणाऱ्या गरजू व लायक विद्यार्थ्यांना मानधन रूपाने आर्थिक मदत.

B

प्रत्येक विषयाची, प्रत्येक वर्गाची, प्रत्येक विद्या शाखेची Question Bank तयार केली. या प्रकल्पाचे UGC (University Grant Commission) कडून कौतुक (Appreciation) झाले आणि आर्थिक मदत मिळाली.

C

महाविद्यालयातील स्नेहसंमेलन आणि इतर समारंभ शिस्तीने व शांततेत संपन्न व्हावे यासाठी प्रयत्न.

स्नेहसंमेलन वगैरे कार्यक्रमानंतर रात्री विद्यार्थ्यांनींना सुखरूप घरी पोहोचता यावे यासाठी विद्यार्थ्यांच्या मदतीने सोबतीची व्यवस्था.

D

शिपाई – पहारेकरी वगैरे चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यासाठी मदत निधीची व्यवस्था व त्यांना हप्त्याने पैसे भरून वार्षिक अन्नधान्य खरेदी करता यावे म्हणून धान्याचा व्यापार करणाऱ्या आपल्या विद्यार्थ्यांचे पालकांच्या मदतीने सुलभ हप्त्याने वार्षिक अन्नधान्य खरेदीची व्यवस्था.

E

प्राचार्य या नात्याने रोज सकाळी ७–७.१५ ला महाविद्यालयातील वर्ग व स्वच्छता गृहांची तपासणी.

F

परीक्षांच्या पूर्वी रात्री ११ पर्यंत ग्रंथालय उघडे ठेवण्याची व्यवस्था.

G

परिक्षांच्या पूर्वी रात्री ११ पर्यंत ग्रंथालय उघडे ठेवण्याची व्यवस्था आणि मधून मधून प्राचार्य या नात्याने तेथे जाऊन पाहणी, करण्याबरोबरच गरजू विद्यार्थ्यांना आवश्यक ती मदत.

H

महाविद्यालयातील पहारेकरी यांनी संध्याकाळी ७ ते सकाळी ७ पर्यंत दर तासाला घड्याळाप्रमाणे घंटेचे टोल देण्याची व्यवस्था त्यात खंड पडल्यास त्याची दखल. (मी जवळच रहात असल्यामुळे मला नो खंड जाणवत असे.)

I

प्राध्यापकांसाठी निरनिराळ्या विषयावर पेपर-वाचन चर्चा आणि बाहेरील तज्ञांना त्यांत सहभागी होण्याचे आवाहन डॉक्टरेट (Ph.D.) प्राप्त प्राध्यापकांचा सत्कार व त्यांच्या विषयासंबंधी चर्चासत्र त्यासाठी त्यांचे मार्गदर्शक व्यक्तींना आमंत्रण व सत्कार.

J

महाविद्यालयाच्या ग्रंथपालाच्या मदतीने निरनिराळ्या वृत्तपत्रे - नियतकालिके सांगून त्यांत आलेल्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच्या दृष्टीने उपयुक्त लेखांची कात्रणे काढून विषयवार त्याच्या फाईल्स आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन.

K

गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना पुस्तकांचे संच व फी मध्ये सवलतीची व्यवस्था.

L

प्रत्येक तास हा व्यवस्थित नियुक्ति व पूर्ण वेळ घेतला जाईल याबद्दल दक्षता.

M

विद्यार्थ्यांची उपस्थिती त्यांनी केलेले गृहपाठ यावर लक्ष ठेवून असमाधानकारक प्रगति आढळल्यास त्यास व त्यांचे पालकांस त्याची जाणीव देऊन सुधारणा करण्याचे आवाहन आणि अत्यंत असमाधानकारक प्रगति असलेल्या विद्यार्थ्यांचे विद्यापीठ परीक्षांचे (Forms) अर्ज नाकारण्याची परत घेण्याची पध्दत.

N

अभ्यासांत खेळांत उत्तम प्रगति करणाऱ्या विद्यार्थ्यांचे सुयोजित कौतुक.

O

शिपायांची (Class Four Servants) भरती करतांना इतर काही कौशल्ये असल्यास, जसे सुतारकाम, लोहारकाम, रंगकाम, विद्युतकामे, पुस्तके वगैरे बाईंडिंग त्यांस पसंति आणि सुट्टीच्या काळात त्यांस काही मानधन देऊन महाविद्यालयात दुरूस्ती आणि देखभालीची व्यवस्था.

W

माजी विद्यार्थी संघटनेची स्थापना व त्या त्या वर्षीच्या २६ जानेवारीला माजी विद्यार्थी मेळावा परस्पराविषयी माहितीची देवाण-घेवाण आणि संकलन.

X

कला शास्त्र वाणिज्य तृतीय वर्षाच्या (T.Y.) विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या विशेष विषयासंबंधी (Special Subject) एक पूर्ण दिवस चर्चासत्र, त्या विषयांतील तज्ञ व्यक्तींना पाचारण आणि त्यांचे मार्गदर्शन.

Y

प्राध्यापकांच्या (Staff Academy) मधील पेपर वाचन आणि चर्चासत्रांमध्ये बाहेरील तज्ञ प्राध्यापक प्राचार्य सार्वजनिक क्षेत्रांतील व्यक्ती यांना पाचारण व त्यांचा चर्चेत सहभाग. विद्यार्थी मित्रांनो तुमच्या बद्दलच्या आठवणी खूप आहेत आणि त्या सर्व चांगल्या आहेत. उपयुक्त आहेत उपयोगी आहेत. परंतु कोठेतरी थांबलेच पाहिजे म्हणुन पुढील दोन आठवणींचा उल्लेख करून थांबतो.

Z

आपला एक विद्यार्थ्याचा रद्दी विकण्याचा उद्योग होता. तो माझ्याकडे आला आणि म्हणाला, 'सर, रोज महाविद्यालयांत खुप रद्दी कागद गोळा होतात. महाविद्यालयाच्या सुरुवातीच्या काळांत तर खूपच. ही सर्व सर्व साठवून ठेवली गेली तर मी ती विकत घेईन. मी कर्मचाऱ्यांना आणि विद्यार्थ्यांना आवाहन केले. रोजच्या रोज रद्दी गोळा करून वेगळी ठेवली गेली. त्याचे त्या काळात (१९७१-७२) रु. १000/- आले. ती रक्कम Students Aid Fund and Clean IV Servants Aid Fund यांत जमा करून त्याचा उपयोग केला गेला.

तुमचाच

**मो.भा. लिमये** (प्राचार्य)

दि. ७/१२/२०२१

---

ज्ञान
आत्मविश्वास
प्रेरणा
मार्गदर्शन
प्रोत्साहन
आणि बरचं काही देणाऱ्या
सर्व गुरूंना वंदन



# मॉडर्न महाविद्यालय एक कुटुंब

प्रि. अ. गो. गोसावी

मी १९७१ ला मॉडर्न महाविद्यालयात व्याख्यात म्हणून रूजू झालो. स्टेट बँक ऑफ बडोदा, अहमदनगर, कॉलेज अहमदनगर, पूना कॉलेज, पुणे अशा ४/५ संस्थात अत्यल्प काळ नोकरी करून मी माझ्या भावी आयुष्याची जडणघडण करणाऱ्या 'मॉडर्न' मध्ये रूजु झालो. गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षण देण्याचा ध्यास घेतलेल्या गुरूवर्य तारके सरांच्या नेतृत्वाखाली 'मॉडर्न' ची उभारणी अतिशय साधेपणाने परंतु गुणवत्तेला सर्वोच्च प्राध्यान्य देऊन करण्याचा निर्धार संस्था चालकांनी सुरवातीपासूनच केला होता. पुण्यातील प्रथितयश महाविद्यालयांशी स्पर्धा करून अगदी अल्प काळात 'मॉडर्न' ने आपली चुणुक दाखविण्यास सुरवात केली. पहिल्याच वर्षी महाविद्यालयाचे ४ विद्यार्थी पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत चमकले. ह्याचे सर्व श्रेय गुणवंत विद्यार्थी व त्यांना मनापासून मार्गदर्शन करणारे प्राध्यापक ह्यांचेच आहे. प्राचार्य मो.भा. लिमये सरांच्या शिस्तप्रिय मार्गदर्शनाखाली 'मॉडर्न'ची वाटचाल अतिशय उत्साहात, आनंददायी व वैशिष्ट्यपूर्ण वातावरणात सुरू झाली. महाविद्यालयाची प्रत्येक गोष्ट शिस्तबध्द पद्धतीनेच झाली पाहिजे असा प्राचार्यांचा कटाक्ष असे. विविध महाविद्यालयातील चांगल्या प्रथा, चांगले शैक्षणिक कार्यक्रम जाणून घेऊन ते मॉडर्न मध्ये सुरू करण्यासाठी प्राचार्य लिमये प्रयत्न करीत असत. विद्यार्थ्यांना शिस्तीचे धडे देतांना ते त्यांच्यावर प्रेमही करीत. म्हणूनच ते अनेक विद्यार्थ्यांचे लाडके होते. त्यांनी खूप चांगल्या प्रथा प्राध्यापक व विद्यार्थ्यांना विश्वासत घेऊन सुरु केल्या. एन्.एस.सी., राष्ट्रीय सेवा योजना, खोखो, व्हॉलीबॉल सारखे मैदानी खेळ ह्याकडे विशेष लक्ष देऊन महाविद्यालयांस स्पर्धेत अजिंक्य पद मिळवून दबदबा निर्माण केला. श्रीरंग इनामदार सारखे क्रिडा क्षेत्रातील राष्ट्रीय स्तरावरचा सर्वोच्च पुरस्कार 'अर्जुनवीर ॲवार्ड' मिळविणारे विद्यार्थी महाविद्यालयाने सुरुवातीच्या काळातच निर्माण केले. विद्यार्थी व तरूण प्राध्यापकांवर देखील चांगले संस्कार होतील, ह्याचीही खबरदारी त्यावेळी संस्था चालकांनी घेतली.

मॉडर्न महाविद्यालयात मी स्वत: सुरुवातीपासूनच रमलो. सुरवातीला मोठ्या विद्यार्थी संख्येच्या वर्गात शिकविताना थोडी भिती वाटायची. परंतु नंतर विद्यार्थ्यांना विश्वास संपादन करून मी शिकविण्याचा आनंद घेऊ लागलो. वर्गात विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळाल्यावर प्राध्यापकाला मिळणारा आनंद काही वेगळाच असतो तो मी मिळवू शकलो. काही हुशार विद्यार्थ्यांचा गट करून त्यांच्याबरोबर नियमित वर्गाव्यतिरिक्त चर्चासत्रे, सहली, अवांतर वाचन असे कार्यक्रम घेऊ लागलो. ह्या सर्व प्रक्रियेमुळे मी विद्यार्थ्यांच्या बरोबरच मी माझे प्राध्यापक म्हणून करिअर घडवू शकलो. सकाळी ७.१५ ला कॉलेजमध्ये जायचे, ११.३० पर्यंत वेगवेगळ्या विषयांचे तास घ्यायचे. त्यानंतर अवांतर वाचन, चर्चा इ. साठी विविध विद्यार्थी /

प्राध्यापक गटांना भेटायचे, जेवण (घरुन आणलेल्या डब्यातून) घ्यायचे. पुन्हा ग्रंथालयात अभ्यास करायचा व सायंकाळी विद्यार्थ्यांबरोबर थोडेसे खेळायचे. अशा अतिशय आनंदी उत्साही वातावरणात 'मॉडर्न'ने मला घडविले.

समाजातील विविध विभागातून आलेल्या विद्यार्थ्यांचा माझा संपर्क असायचा. अनेकदा विद्यार्थ्यांच्या घरी देखील जाण्याची वेळ यायची पण त्या सर्वांमध्ये आपुलकी, प्रेम होते. महाविद्यालयात विविध प्रकारची चर्चासत्रे, सेमिनार, शैक्षणिक परिषदा मोठ्या प्रमाणावर होत असत. वाणिज्य, विज्ञान, कला, साहित्य नाट्य अशा विविध विषयांतील चर्चासत्रांत, राष्ट्रीय स्तरांवरील मान्यवर व विद्वान व्यक्ती यंत असत. कार्यक्रमांची रेलचेल असे. खूप चांगले ऐकायला पाहावयास व शिकायला मिळे. माझा एक प्राध्यापक मित्र तर म्हणायचा मॉडर्न कॉलेजचे नाव मॉडर्न कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स, कॉमर्स ॲण्ड सेमिनार्स/कॉन्फरन्सेस असेंच ठेवले पाहिजे. (सतत होत असणाऱ्या सेमिनार, चर्चासत्रे इ. मुळे त्याने अशी कॉमेंट केली होती.) मॉडर्न महाविद्यालयाचे त्यावेळचे एक वैशिष्ट्य म्हणजे प्राध्यापक अभ्यास मंडळ. (Staff Academy) प्राध्यापकांनी आपला शोधनिबंध सादर करायचा तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली चर्चा करावयाची, अशी अनेक सत्रे होत असत. विविध क्षेत्रातील अनेक तज्ज्ञ व्यक्तींना महाविद्यालयात पाचारण केले जात असे व त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ सर्वांना मिळत असे.

विद्यार्थीसंख्या वाढू लागल्यावर महाविद्यालयाची इमारतही मोठी होऊ लागली. अद्ययावत प्रयोगशाळा, सुसज्ज ग्रंथालय, जिमखाना, कला मंडळ, क्रिडा क्षेत्रातील नैपुण्य ह्यामुळे दिवसेंदिवस मॉडर्नचा लौकिक वृध्दींगत होत गेला व पुण्यातील एक दर्जेदार महाविद्यालय म्हणून महाविद्यालयाची गणना होऊ लागली. महाविद्यालयाने क्रिडाक्षेत्राबरोबरच नाट्य कला, वक्तृत्व इ. क्षेत्रातही विद्यार्थ्यांना कर्तृत्वामुळे भरपूर यश मिळविले, पुरुषोत्तम करंडक सारख्या प्रतिष्ठित स्पर्धेत सलग २/३ वेळा करंडक मिळविण्याचाही पराक्रम केला. वक्तृत्व स्पर्धेत श्री. अविनाश धर्माधिकारी, यशोधरा भालेराव, श्री. सुदिल दादे, श्री. सीताराम गायकवाड यांनी महाविद्यालयाच्या नावलौकिकात मोलाची भर घातली. श्रीमती हेमा लेले (अभ्यंकर) प्रतिभा कान्हेरे, श्री. रविंद्र गुर्जर, श्री. शाम वाघ इ.नी विद्यापीठ शिक्षण उच्च यश संपादन करून महाविद्यालयाचा उच्च दर्जा प्रस्थापित केला.

'मॉडर्न' मध्ये विद्यार्थी व प्राध्यकांचे संबंध अतिशय जिव्हाळ्याचे व सौहार्दपूर्ण असे असायचे. विद्यार्थ्यांच्या सहली, स्नेहसंमेलने अतिशय उत्साही आनंदपूर्ण वातावरणात होत असत. आम्ही क्रीडाप्रेमी काही प्राध्यापक विद्यार्थ्यांच्या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेतील सामन्यांना

आवर्जून उपस्थित राहत असू. विद्यार्थ्यांनाही त्यामुळे प्राध्यापकांशी मोकळेपणाने वागून आपल्या अडीअडचणी सोडविणे सहज शक्य होत असे. माझी अनेक विद्यार्थ्यांशी ''मैत्रीपूण'' संबंध असल्याने विद्यार्थी माझ्या घरी येत असत व आपल्या वैयक्तिक अडचणी मांडून मार्गदर्शन घेत असत. 'मॉडर्न' हे त्यावेळी एक मोठे कुटुंबच वाटत असे.

'मॉडर्न' ला ७० वर्षे झाली. 'मॉडर्न' सुरुवातीच्या (अगदी पहिल्या वर्षाच्या) विद्यार्थ्यांना अभिमान, आनंद वाटावा अशीच महाविद्यालयाची वाटचाल आहे. सर्व विद्यार्थी प्राध्यापक संस्था चालक ह्यांनी 'मॉडर्न'च्या जडणघडणीत मोलाचे योगदान दिले आहे. सर्वांचे अभिनंदन, अभिष्टचिंतन.

**प्रि. अ. गो. गोसावी**



# मोट अजून सैल झालेली नाही

**जयंत प्रभाकर अभ्यंकर**

१९७० चा जून महिन्याचा पहिला आठवडा होता. सायकलवरून पावसाचा मारा चुकवत ११वीची गुणपत्रिका (Marksheet) घेऊन मी ११.००-११.१५ वाजता कॉलेजच्या ऑफीससमोर येऊन उभा होतो. मला प्रवेशासाठी प्राचार्यांना भेटावयाचे होते. त्यांचे नाव देखील तेव्हा माहीत नव्हते. मोरेश्वर भास्कर लिमये यांचे १/२ तासाने दर्शन झाले. मी S.P. College मधून शास्त्र शाखेत शिकत होतो. पण शारीरिक कारणांसाठी मला कॉमर्सकडे प्रवेश हवा होता. त्याच सुमारास मला शेठ दगडूराम कटरिया शाळेत गुलटेकडीला आधी लेखनिकाची व नंतर शिक्षकाची नोकरी चालून आली होती. माझी गुणपत्रिका पाहून लिमयेसर गालातल्या गालात हसले असावेत. त्यांनी लगेच श्री. देशपांडे सरांना भेटून फॉर्म भरण्यास सांगितले. २/४ दिवसात पैसे भरून अस्मदिक मॉर्डन महाविद्यालयाचे विद्यार्थी झाले.

आमचा वर्ग दुसऱ्या मजल्यावर होता. मा. एम. ए. कुलकर्णी, आनंद गोसावी, पाथरे, महाजन, प्राचार्य लिमये यांनी आम्हाला पूर्ण भरलेल्या वर्गात अध्यापन सुरू केले. काही सरांच्या तासांना कागदाची विमाने, बाण मुलींच्या बाकांकडे पाठवणे, चिंचा खाणे, फळ्याजवळील खडू चोरणे, चोरून भेळ खाणे. अशा उद्योगात आपण नक्की कशासाठी येथे येतो हे विसरून अत्यंत आनंदात आमची आगेकूच चालू होती. दुसऱ्या टर्ममध्ये काही हुशार मुलांना घेऊन प्रा. गोसावी सरानी Commerce Association ची मोट  बांधली. त्यात नवीन चर्चा सत्रे, विचार, धावपळ याने आमची छोटीशी धडपड चांगले रुप घेत होती.

श्री. कुलकर्णी सरांचा वर्ग सुरू होता. आणि... एकाएकी वर्गात छतावरून पाणी गळू लागले व मुला मुलींच्या वह्या पुस्तके यांच्यावर अभिषेक सुरू झाला. पाऊस ढगातून न पडता आमच्या वर्गाच्या छतातून पडू लागला व एकच गडबड उडाली. पण ऑफीसमध्ये जाऊन सांगण्याचे कोणाचेच धाडस झाले नाही.

लवकरच पहिली टर्म संपली व आम्हाला सुट्टी लागली.

मुलांपैकी काही जणांना स्कूटर येत होती. त्यावरून अप्सरा, अल्पना, अलंकार अशा लांबच्या टॉकीजवर धावत धावत जाऊन, वेळप्रसंगी एका दुचाकीवर तीनजण सवार, नवीन सिनेमा First day first show बघण्याची उत्तम सवय आम्हास लागली व ३१ पैसे कधी जमवतोय आणि सिनेमाचा बेत ठरवतोय असे होऊन जायचे.

एकदा सायकल स्टँडवर मुले बोलत होती व एका मुलीला कॉलेजला येताना सायकलवरून पाडले तर काय मजा येईल अशी चर्चा झाली. ४/६ दिवसांनी मी एका मित्राच्या घरून सायकलवरून (तीव्र उतारावर) छोट्या कॉजवे वरून जात होतो. मला कल्पनाही नव्हती की

मागे पुढे  कोण आहे. आणि अचानक काय होते आहे ते कळण्यापूर्वीच तीव्र उताराने सायकल एका मुलीच्या सायकलवर धडकली. मग काय  बोंबाबोंब प्राचार्यांनी मला केबीनमध्ये बोलवून घेतले व माझे I - Card जप्त केले I /Card फक्त वाचनालयात पुस्तके घेण्यासाठी लागत असे पण लायब्ररीयनशी माझी चांगली दोस्ती असल्याने माझे काहीच अडले नाही. काही दिवसांनी प्राचार्यांनी पुन्हा बोलावले व विचारणा केली की तुला I /Card लागत नाही का? आणि तू शेवटच्या तासाला हजर का नसतोस. मी सपशेल माफी मागितली व सांगितले की मला गुलटेकीच्या शाळेत नोकरीसाठी जावे लागते. हे सांगितल्यावर त्यांनी माझे कार्ड परत केले व पुन्हा तक्रार येता कामा नये असा दम दिला. कुलकर्णी सरांना ते अगदी धुमाळ या नटासारखे दिसत असल्याने त्यांना सगळीच मुले धुमाळ म्हणत असत. बाहेरून एकदा एक अनोळखी इसमाने आत येऊन तास कोणाचा आहे ?  असे विचारले. समोरचा मुलगा चिंच खात होता तो पटकन म्हणाला धुमाळसरांचा!! तेवढ्यात कुलकर्णीसर पण आले, पण त्यांनी मोठ्या मनाने आमच्या वर्गाला माफ केले.
आता त्या काळातली एका हॉटेलात घडलेली एक मजेदार गोष्ट सांगतो. कॉलेजमधील ६/७ मुले कॅफे गुडलक मध्ये गेलो. सकाळी टेकडीवर फिरायला गेलो होतो. तो बहुदा रविवार होता. त्याला चहा, कॉफी व खारी सांगितली. त्याने ३ चहा, ४ कॉफी व ताटभर पिळाची खारी व नानकटाई ठेवल्या. आम्हाला भूक अनावर झाल्याने सगळे त्यावर तुटून पडले. सर्व संपवल्यावर एकाने बिल विचारले. त्याने ते सांगताच आमच्या सगळ्यांचेच चेहेरे फोटो काढण्यासारखे पावडर न लावता पांढरे फटक पडले. सगळ्याच्या खिशातली चिल्लर व नोटा काढूनही ती रक्कम जेमतेम ३०% झाली. नशिबाने एका मुलाचे नातेवाईक जवळच रहात होते. ते घरी होते व त्यांनी आम्हाला मदत केली अन्यथा भांडी घासण्याची उत्तम सवय आम्हास झाली असती. दुसऱ्या दिवशी हा किस्सा आम्ही गोसावी व पाथरे सरांना सांगितला तेव्हा ते म्हणाले अंथरुण पाहून पाय पसरायला लागा, आता तुम्ही लहान नाही
मग कुणीतरी सहलीची कल्पना मांडली. सकाळी लोकलने लोणावळा मग राजमाची आणि संध्याकाळी परत असा बेत ठरला. बहुदा रविवार; त्याप्रमाणे जुळवा जुळवी झाली व ८ ची लोकल पकडली बहुतेक सर्वांनी. मग गाडीतच गाण्याच्या भेंड्या, विचित्र आवाज करीत दीड तासांनी आम्ही लोणावळ्याला पोहोचलो. स्टेशनच्या बाहेरच इडली खाऊन चहा कॉफी झाली व चिक्कीची पाकिटे घेऊन आम्ही राजमाचीकडे कूच केले. साधारण ३० मुले मुली जमेल तेवढा दंगा करत चालली होती. वाटेत एका हवालदाराने, 'ए पोरांनू ओरडू नका, नायतर फटके मारीन' असा दम दिला. तेवढ्यात पावसाची सर आली, आम्ही सगळे खेकडा भजीवाल्याजवळ होतो. मग काय, मनावरील संयम सूटला व पैसे आहेत ऐवढी भजी

खाण्यात आम्ही पाऊस कधी थांबला ते विसरलो. मग रमत गमत हिरव्यागार निसर्गाच्या कुशीत ते ३० जीव मनापासून रमले. धावाधावी, रींग, बॉल फेका फेकी, गप्पा. चिडवा चिडवी बरेच जणांची स्वगते चालली होती. मग २.३० वाजता घरून आणलेली पोळी भाजी, पिठले, चटण्या यांचेवर ताव मारून बरेचजण त्या ओलसर हिरवळीवर आडवे झालो. थोड्यावेळाने ५ च्या गाडीने जायचे ना? अशी विचारणा झाली. तेव्हा ४.३० वाजले होते व अर्ध्या तासात पोचणे अवघड होते. कारण काहीजण जेवणानंतर गजगामिनी झाले होते. वाटेत गप्पा मारत घरच्यांसाठी चिक्कीची पाकिटे घेत आम्ही ६ च्या आसपास स्टेशनवर पोहोचलो. आता लोकल ७.३० वाजता. बोंबाबोंब होइल का? घरी घेतील का ? असे अनेक प्रश्न मनाला घाबरवून गेले. कारण ७.३० ची गाडी ९.00 चे आसपास पोहोचेल. एका मुलीने हुशारीने टेलिफोन बूथवरून आम्ही ९.00 चे आसपास येऊ असे घरी कळवले. व सरांना पण सांगण्यास सांगितले. ती ७.३० ची लोकल वेळेवर सुटली पण पुढे मालगाडीमुळे २० मिनिटे उशीरा पोहचली. आमच्या पैकी काहीचे पालक स्टेशनवर आमच्या स्वागताला उभे होते. असो. आता जवळची सहल काढायची नाही. लांबवर मुक्कामची सहल ठरवायची या नोटवर हे प्रकरण बंद केले गेले. काहींना गोड आवाजात दणके मिळाले, आस्मादिकही त्यातले एक.

आता NSS बद्दल थोडेसे. खेळाच्या शिक्षकांनी आम्हास NSS मध्ये सामिल होण्याचे आवाहन केले. ते ठराविक पोषाख, रविवारी सकाळी एकत्र कवायत व कसरती मग दोन बिस्कीटचे पुडे व कॉफी. असा एकंदर मामला. बरेचसे NSS मध्ये आले. मग एकदा आम्हाला त्यांनी मोठ्या बसमधून २ दिवसांसाठी उंड्री पिसोळी ह्या भागात नेले. तेथे गेल्यावर रस्ता करण्याची जबाबदारी होती. माती टाकणे, दगड गोळा करणे. या कामात आपल्या अंगावर व तोंडावर मातीचे थर जमा होत असत. जेवण व चहा शिवाय आराम नसे. आवडेल त्याच्या नावाचा पुकारा करून आम्ही माती दगड टाकले. रात्री मात्र फारच छान होत्या. एकतर कॅम्पफायर होते. त्याभोवती बसून गाणी, भेंड्या. थोडक्यात चकाट्या हा आवडता उद्योग होता. सकाळ मात्र बंद दरवाज्याची सवय असलयाने थोडी विचित्र गेली. पण झाले सगळे, एकदाचे २ दिवस गेले पण हातावर पायावरचे वळ जायला ८ दिवस लागले. आमच्यातील काही लोकांनी मोरगाव व गोकाक येथे देखील सहली काढल्या पण त्याचे वर्णन लिहायला वेगळे पुस्तक लागेल म्हणून त्याचा नामोल्लेख.

चार वर्षे बघता बघता हातातल्या वाळू सारखी घसरली. त्यांनी काय दिले?

सगळ्याच सरांनी आम्हाला शिकवले. ते रागावले-चिडले पण ते आमच्यासाठी होते हे आता समजत आहे. त्यांच्यावरील अलोट आदराने आम्ही भरून पावलो. त्यांनी आमच्यातल्या

काहींची बांधलेली मोट ५० वर्षांनंतरही अजून सैल सुद्धा झालेली नाही. नातेवाईकांएवढीच घट्ट वीण झाली आहे. चांगल्याशी चांगले व वाईटाशीही चांगलेच वागावे, कसे बोलावे व काय बोलावे,  पुढील आयुष्यात जिभेवर साखर व डोक्यावर बर्फ ठेवल्यास अडचणी कमी होतील, कोणावरही आंधळा विश्वास ठेवू नये, पोषाख साजेलसा करावा, दुसऱ्याच्या अडचणीत जमेल तेव्हढी मदत करावी जितके जमेल तेव्हढे स्वत: आनंदी राहून दुसऱ्यास आनंदी करण्याचा प्रयत्न करावाखूप गोष्टी सांगण्यासारख्या आहेत पण आता लांबण आवरतो.

निवृत्त तरुण मित्र मैत्रिणींना दुसरी, तिसरी, इनिंग हसत मजेत निरोगी लाभो अशी ईश्वराजवळ प्रार्थना करतो.

खरच त्या मंतरलेल्या दिवसांची मोहिनी अजूनही आम्हाला टवटवीत करते

नमस्कार!!

**जयंत प्रभाकर अभ्यंकर**



हिऱ्याप्रमाणे पैलू पाडतो तो गुरू
जीवन जगण्याचा योग्य मार्ग दाखवतो तो गुरु
जीवनातला खरा आनंद शोधायला शिकवतो तो गुरू
आव्हानांवर मात करायला आत्मविश्वास मिळवून देतो तो गुरू

# उद्योगजतेला उभारी

**भैरवनाथ काळे**

मी भैरवनाथ काळे, वरूडे, ता. शिरूर, जि. पुणे येथील एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील मोठा मुलगा. माझ्या घराची उपजिवीका शेतीवरच होत असल्यामुळे घरात खुप गरिब परिस्थिती होती. परंतु माझी आई लक्ष्मीबाई व वडील रंगनाथ काळे यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखल्यामुळे. गरिब परिस्थिती असूनही व पदरी सात मुले असूनही शिक्षणाचा आग्रह धरला. शालेय शिक्षण नातेवाईकांकडे राहून पूर्ण केले. कॉलेज शिक्षणाची वेळ आल्यावर पुणे गाठले.गाठीशी असलेले तुटपुंजे पैसे, गावाकडून पहिल्यांदाच पुण्यासारख्या मोठ्या शहरात आलेला. आजुबाजुचे वातावरण पाहून गोंधळून गेलो. कोणती शाखा निवडायची, कोणते कॉलेज निवडायचे काहीच माहिती नव्हती. अशावेळी माझे मित्र श्री. विलास अत्रे मदतीला आले. फर्ग्युसन, स.पा. या महाविद्यालयांकडून नकार मिळाल्यावर मॉडर्न कॉलेजमध्ये ॲडमिशन मिळाली. ज्या लाईनला उभा राहिलो तिथेच ॲडमिशन घेतले नंतर ती कॉमर्स शाखा असल्याचे कळले. ॲडमिशन घेतल्यावर फक्त इंग्लिश मिडीयम असल्याचे कळाले. ग्रामीण भागातून शिक्षण, गरीब परिस्थिती या सगळ्यात पहिले सहा महिने खुप अवघड गेले. राहणे खाणे सर्वच अवघड होते. सुरुवातीला कसबा पेठेत दादासाहेब दोंदे विद्यार्थी वसतीगृहात राहिलो. तिथे सवलतीच्या दरात राहण्याची सोय होती. दररोज चालत कॉलेजला यायचो त्यावेळी सुरेशचंद्र पाध्येसारखे मित्र भेटले. जेवणाचे डबे माझे वडील रोज ५ कि.मी. चालत येत व एस.टी.ने पाठवून देत. तोच डबा सकाळ, संध्याकाळ व दुसऱ्या दिवशीही पुरवून खायचो. अशा परिस्थितीत शिक्षण चालू असताना ७२ चा दुष्काळ आला. या काळात विद्यार्थि सहाय्यक समिती डॉ. अरूण लिमये, डॉ. कुमार सप्तर्षी यांची खूप मदत झाली. कॉलेजचे शिक्षक व वर्गमित्रांनी पण खूप मदत केली. श्री. रत्नाकर लामखेडे, श्री. वसंत कवडे या मित्रांनी वेळप्रसंगी रहाण्यासाठी, फीसाठी मदत केली. या सर्व अडचणीतून मात करत बी.कॉम. (ऑनर्स) केले. मी आमच्या परिसरातून पहिला पदवीधर होतो याचा मला व माझ्या कुटुंबाला खूप आनंद झाला. कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे शिक्षण अर्धवट सोडून इराणला नोकरी केली पण जबाबदाऱ्या कमी झाल्यानंतर परत येवून वडिलोपार्जित शेती व दुग्ध व्यवसायात लक्ष घातले. हळूहळू व्यवसायात प्रगती करत गेलो. आज माझ्या सुरूची डेअरीच्या माध्यमातून व साईसहारात पेट्रोलियमच्या माध्यमातून मी परिसरातील लोकांना रोजगार मिळवून दिला तसेच यशस्वी उद्योजक म्हणून उभा राहिलो यात माझे आई वडिल, मॉर्डन कॉलेज व माझे मित्र यांचाही मोलाचा वाटा आहे.

माझ्या उद्योजकतजेला मॉडर्नमधल्या दिवसांनीच उभारी दिली, हे मी विसरत नाही.

**भैरवनाथ काळे**

मु.पो. वरूडे, ता. शिरूर, जि. पुणे

# दैव जाणीले कोणी

**चंदू गोडबोले**

मी श्री. चंद्रकांत मोरेश्वर गोडबोले रा. १३६२, सदाशिव पेठ, सजावट फर्निचर समोर, चिमण्या गणपती ते बाजीराव रोड गल्ली, पुणे ४११०३० या ठिकाणी सन १९६० पासून राहत आहे. माझे शालेय शिक्षण महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या पेरूगेट भावेस्कूल शाळेतून होऊन १९६८ साली जूनी एस.एस.सी. परीक्षा पास झालो व प्रथेनुसार संस्थेच्या गरवारे कॉमर्स कॉलेजमध्ये प्री डिग्रीसाठी प्रवेश घेतला.

प्री डिग्री परीक्षेमध्ये दोन विषय नापास झालेमुळे सदर विषय पास होण्यामध्ये दोन वर्षे गेली व पास झाल्यानंतर गरवारे कॉमर्समध्ये प्रथम वर्ष कॉमर्सला प्रवेश मिळाला नाही.

प्रथम वर्ष पास होताना माझा मित्र कै. रविंद्र आठवले यांची मावशी पुणे विद्यापीठात नोकरी करत असल्यामुळे कळाले की मराठीचे दोन प्रश्नांचे मार्क देण्यात आले नाहीत. सदर दोन प्रश्नांचे मार्क मिळणेसाठी सलग ९० दिवस पुणे विद्यापिठामध्ये सायकलने फेऱ्या मारून एकदाचे मार्क मिळून मी पास झालो.

मॉडर्न कॉलेज नवीन सुरू झाले असल्याने व इलाईट फर्निचरचे मालक कै. वसंतराव गाडगीळ यांच्या ओळखीमुळे व प्रिंन्सिपॉल लिमये सरांमुळे मला खेळामुळे (शरीरसौष्ठव व वजन उचलणे) प्रवेश मिळाला.

मॉडर्न कॉलेजमध्ये असताना सर्व तीन वर्ष मी माझे गटामध्ये शरीरसौष्ठव वजन उचलणे व मुष्टीयुध्द यामध्ये कायम प्रथम क्रमांक मिळवून कॉलेजला ही मान मिळवून दिला.

माझे पासून मॉडर्न कॉलेजमध्ये मॉडर्न श्री स्पर्धा सुरू झाली व प्रथम वर्षी प्रथम क्रमांक मलाच मिळाला.

दरवर्षी बक्षिस समारंभामध्ये बक्षिस घेताना इतरांपेक्षा सर्वात जास्त टाळ्या व शिट्या घेत असे.

कॉलेजमध्ये शिकविणारे सर्व प्राध्यापक श्री. पाथरे, श्री. महाजन, श्री. भावे, आचार्य लिमये, श्री. चिरपुटकर थोडक्यात सर्वच प्राध्यापकांनी शिकवलेले ज्ञान कधी विसरू शकणार नाही. त्यावेळी सर्वांचे सुटा बुटात राहणे का हे आता कळते.

कॉलेजमध्ये असताना पतितपावन संघटनेचे काम सुरू केले. सदर संघटनेचे काम करताना माझे बरोबर असलेले कै. भीमराव बडदे, श्री. अनिल शिरोळे, श्री. प्रदीप रावत, श्री. गिरीश बापट खासदार झाले तर श्री. सुरेश नाशिककर पुण्याचे उपमहापौर झाले. याबद्दल मला आजही खुप आनंद होतो व या सर्वांचे आजपर्यंत मला सहकार्य मिळत आले आहे.

कॉलेजच्या खो खो स्पर्धा यामध्ये होणारे चिअरिंग आजही आठवते. कॉलेजची सर्व मुले खास करून पतितपावनशी संबंधित स्पर्धेवेळी हजर असत.

श्री. गोसावी सर बँक नोकरी सोडून कॉलेजला आले तर कै. मिजार सर कॉलेज सोडून बँकेत गेले. यांच्या बरोबर लोणावळा येथे गेलेली सहल आठवते. त्या सहलीमध्ये मिजार सरांनी म्हणलेले गाणे व गोसावी सरांना चिठ्ठी नुसार पांच बैठका मारण्याची शिक्षा आठवते. तर मिजार सरांना कोलांट्या उड्या माराव्या लागल्या.

एक वर्ष बक्षिस समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून कै. खा. एस.एम. जोशी सर आले होते. लिमये सरांनी कॉलेजची प्रगती बी.ए., बी.कॉम,बी.एस्सी. सर्व मिळून एवढी मुले पदवीधर होणार त्यावर एस.एम. जोशी म्हणाले एवढ्या पदवीधर मुलांना नोकरी कधी मिळणार? परंतु आजपर्यंत मला माण्या कॉलेजचे कोणी बेकार राहिलेले भेटले नाही.

पाथरे सर व्हॉलीबॉल शिकवतांना तर लागू सर इतर खेळ शिकवतानाचे अजून डोळ्यासमोर आहेत.

कॉलेजमध्ये असताना भारती शहा हीस बॉल बॅडमिंटन खेळताना बघितले पण नंतर हा खेळ पुन्हा कधीच बघायला मिळाला नाही.

कॉलेज शिक्षण संपताना जाणवले की आपण आता पक्षीय, जातीय धर्मिय पध्दतीचे कोणतेच काम करावयाचे नाही तर असे काम करावयाचे ज्यामध्ये भेदभाव नाही म्हणून रिक्षा युनियन, रक्तदान शिबीर व पुढे सैनिकांसाठी काम करावयास सुरूवात केली व आजही करीत आहे. ३० वर्ष अभ्यासपूर्वक रक्तदान शिबीर व ३० वर्ष सैनिक कल्याण निधी गोळा करून दिला.

कॉलेजमध्ये कॉमर्सच्या सर्व विषयांचा मला रिक्षा युनियनमध्ये काम करताना परमिट धोरण, फेअर मिटर आकारणी, कायदा व नियमांचा अभ्यासासाठी खूप उपयोग झाला.

आपल्या बॅचचा सेंड ऑफ होता. त्यावेळी मी भाषणामध्ये उदाहरण दाखविले होते की प्रश्न होता - Discribe the Jute Industry in India आणि उत्तर लिहिलेले होते. Describe the Cotton Industry in India.

मार्क २० पैकी १५ दिले होते. खरेतर 0 मार्क देणे आवश्यक होते. परंतु आजही ५0 वर्षांनी सेंड ऑफच्या भाषणात सांगितलेला हा अनुभव मला आजही खटकतो.

वर्गमित्र श्री शाम वाघ, श्री. राजीव बोडस, श्री. गुर्जर, श्री. सुतार, श्री. सुरेशचंद्र पाध्ये यांच्या बरोबर अभ्यास केला असता तर एखादवेळेस मी बी.कॉम. झालेनंतर सी.ए. सुध्दा झालो असतो कारण माझे वडील सी.ए. होते.

कॉलेजमध्ये आय.सी.सी.आर. च्या निवडणुकीसाठी प्रथम वर्षी अर्ज केला. परंतु निवडून आलो नाही. पुढे भविष्यात समजले की दरवर्षी उभे राहावयास हवे होते.

श्री. राजीव बोडस यांचेकडे एक बेबी बुलेट / ट्रांक मोटारसायकल होती ती अनेक वेळा

चालविली / फिरलो.बोडसनी कधी पेट्रोलचा विषयसुध्दा काढला नाही. एक वेगळाच माणूस. १९७५ मध्ये अचानक आई व वडिलांचे निधन झाल्यामुळे बहिण व भावाची सर्व जबाबदारी सांभाळत २५ वर्षे रिक्षा चालवून, रिक्षा युनियनचे काम करण्यात गेली व अजूनही काम चालू आहे.

रिक्षा युनियनचे काम करताना सन १९८४ रोजी पुण्यातील शिवाजी रोड व बाजीराव रोड एकेरी करावेत आणि मागणी केली परंतु प्रत्यक्षात सन २००० मध्ये १६ वर्षांनी पुर्णत: एकेरी झाले. त्याचवेळी सदर रोडच्या वर रेल्वे करावी व वरून किंवा खालून वाहतूक जावी असे मत मांडलेले होते. आज रेल्वे नाही पण मेट्रो धावणार आहे.

कमिशनर सहस्त्रभोजने सर असताना एकेरी वाहतुकीचे चिन्ह नव्याने सुरू करून प्रथम पुण्यात वापरले गेले अन्यथा मुंबईमध्ये सुध्दा बोर्ड असायचा की हा रस्ता एकेरी आहे परत येऊ नये.

कमिशनर भावे साहेब असताना गणेशोत्सवात दगडूशेठ कडून, बाबूगेणू, तुळशीबाग व गणपती चौक पायी जाण्यासाठी एकेरी केला. ही पध्दत आजही चालू आहे.

सन १९८५ पासून प्रत्येक वाहनाच्या मालकाच्या वाहनाचा विमा असावा असा प्रयत्न सुरू केला. सदर सुधारणा होण्यास सन २००० उजाडले. तर आता वर्तमान काळात प्रत्येक वाहनाच्या विम्यात मालकाची रु. १५ लाखाची तरतूद झाली.

सन १९८७ साली खाजगी वाहनांसाठी एकरकमी करपध्दत आली. त्यावेळी सदर पध्दतीस पुण्यामध्ये मी एकमेव व्यक्ती पाठिंबा देणारा होतो व आता सर्वच वाहनांना एकरकमी टॅक्स आहे.

त्याचप्रमाणे एकरकमी विमा असावा म्हणून पाठपुरवा केला व सन १९९० ते २००० पर्यंत सदर एकरकमी विमा पध्दत चालू होती. व आजही काही वाहनमालक त्याचा फायदा घेत आहेत.

सन १९९० पासून आजपर्यंत एलआयसी व जीआयसी च्या एजन्सीचे काम करीत आहे.

पुणे आर.टी.ओ. ऑफिसमधून कॉम्प्युटरवरील रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट देण्याची सुरवात रिक्षसाठी प्राधान्याने करून दिली.

माझा मोठा मुलगा शहिद कॅप्टन सुशांत गोडबोले हा एमएससी होऊन आर्मी मध्ये ऑफिसर झाला परंतु संसदेवर हल्ला झाला त्या सुमारास जम्मू सिमेवर ही हल्ला झाला त्यावेळी सुरुंग स्फोटात त्याचा अंत झाला.

मुलगा शहिद कॅप्टन सुशांत गोडबोले याच्या स्मरणार्थ राणाप्रताप उद्यान, बाजीराव रोड येथे २००६ मध्ये स्मारक बनविण्यात आले.

सदर स्मारकाशी २००६ पासून दरवर्षी प्रेरणा दिन २९ जानेवारी रोजी साजरा करण्यात येतो. सदर तारखेस आपण सर्वजण भविष्यात एकत्र येऊ ही अपेक्षा.

कॅप्टन सुशांत गोडबोले व माझे वडील कै. मोरेश्वर विनायक गोडबोले यांच्या नावाने कायम स्वरूपी चॅम्पीयन ट्रॉफी व रोख रक्कम स्वरूपात महाराष्ट्र मंडळामध्ये बक्षिस ठेवले आहे.

थोडक्यात माझ्या आयुष्यात खूप काही घडत गेले. खूप पैसे मिळविले नाहीत पण समाजासाठी जे शक्य आहे ते करण्याचा प्रयत्न केला व करीत राहीन व त्यासाठी आपल्या सर्वांच्या शुभेच्छा व सहकार्य मिळत राहो ही विनंती. आपण सर्व जण एकत्र आहोत याबद्दल अभिनंदन.



P. E. SOCIETY'S
MODERN COLLEGE OF ARTS, SCIENCE AND COMMERCE,
PUNE-5
ACADEMIC EXCELLENCE SENIOR COLLEGE

Sr. No. Year Name of the student

1. 1973 DALWALE GHANSHYAM
2. 1974 GURJAR RAVINDRA
3. 1974 ABHYANKAR HEMA (Dr. LELE HEMA)
4. 1975 JOGALEKAR CHHAYA S.
5. 1976 ABHYANKAR HEMA (Dr. LELE HEMA)
6. 1976 JADHAV MANGALA (Dr. Mrs. TAWARE SNEHAL)
7. 1977 HASABNIS SANJEEVANI
8. 1979 KANETKAR GIRISH
9. 1980 RAHANE SANJEEVANI
10. 1980 INAMDAR WASANTI
11. 1989 PROF. NAIDU NARENDRA M.
12. 1991 ZUNJARRAO RAJENDRA
13. 1994 DATE SEEMA
14. 1995 JAIN PEEYUSH
15. 1996 DEVGAN SHEFALI
16. 1996 NAGARKAR SAVITA
17. 1998 MENGLE ASHWINI

Award

1st at B.Com in the Subject Costing
1st at B.Com in the Subject Costing
1st at B.A. Marathi
Sp. Gold Medal and Five Prizes
1st at B.Com Examination
1st at M.A.
Marathi All Prizes
1st at M.A. Marathi
Alankar Shastra
6th at B.Com. Examination
1st Rank at B.Com
6th at M.Com. Examination
1st at B.A. Marathi.
Delhi-Maharashtrian Gold Medal.
H.L. Lagoo Prize
First student to obtain M.Phil Degree at Post Graduate Research Centre, Dept. of Zoology. Research Guide : Dr.S.Y.Paranjape
First past student of the college to obtain Ph.D.in the Post Graduate Research Centre, Dept of Botany. Modern College, Pune-5. Research Guide : Dr. A.K.Pande
1st at B.Sc. in Mathematics
1st at B.Sc. in Mathematics
1st at M.Sc. in Zoology in the subject Entomology Karandikar Prize
1st at M.Sc. Botany in the subject Angiosperms V.D. Vartak Award
2nd at M.Sc. Electonic Science

# तरूणच असतं म्हातारपण

लता कुबेर गुर्जर

मला अकरावीला चक्क चांगले मार्कस् मिळाले होते. पुणे हे विद्येचे माहेरघर आहे असा दृढ समज होता. त्यामुळे परिस्थिती नसतानाही मुलीला पुण्यात शिकवायला पाठवावे यासाठी आई वडिलांनी खूप आटापीटा केला आणि मी वाईहून पुण्यात शिक्षणासाठी आले.
त्यावेळी मला एस.पी. कॉलेजमध्ये मेडिकलला सहज स्कॉलरशीप मिळत होती आणि मला सायन्सला प्रवेश मिळत होता. पण पुस्तक, हॉस्टेल खर्च असा वर खर्चही परवडण्यासारखा नव्हता आणि त्याकाळी वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना सहज नोकऱ्या मिळत होत्या. ह्या एकाच कारणासाठी वाणिज्य शाखेत प्रवेश घेण्याचे ठरवले आणि १९७० च्या जूनमध्ये आपल्या कॉलेजमध्ये पी.डी. व्या वर्गात दाखल झाले.
खेड्यातुन आपण जेव्हा शहरात येतो तेव्हा मोठ्याल्या इमारती, फॅशनेबल मुलं, मुली, एंटरटेनमेंटची खुली दारं बघुन हरवायला होतं. माझही अगदी तसचं झालं होत.
हिरवा फुग्याचा टॉप, केशरी घेराचा स्कर्ट, कानात प्लॅस्टीकची भोकरं आणि रेबीनी लावलेल्या दोन वेण्या आपण खूपच सुंदर दिसत आहोत अस समजून कॉलेजमध्ये प्रवेश केला आणि लगेच भ्रमाचा भोपळा फुटला.
एकसेएक हुषार आणि देखणी मुलं मुली आसपास होती. जीव दडपून गेला.
कॉलेज जीवन कसं असत ह्याच्या शक्य गोष्टी ऐकल्या होत्या पण कॉलेजमध्ये पाऊल टाकले आणि लिमये सरांची गाठ पडली. मुला मुलींनी जिन्यातून वेगवेगळ्या बाजूने जायचे हा नियम लगेच लक्षात आला. इथे शाळेपेक्षा फार काही वेगळे नाही. हा विश्वास वाटतो. अर्थात सरांची शिस्त आम्हा मुलींचा आत्मविश्वास वाढवणारीच होती.
हळूहळू वातावरणात रूजत गेलो. गोसावी सरांच्या कृपेने स्कॉलर बॅच मध्ये प्रवेश मिळाला. काही टवाळ पण हुशार मुलांची संगत मिळाली आणि आयुष्याला आकार मिळाला.
खरंतर अभ्यंकरने त्याच्या लेखात जवळजवळ सर्व गोष्टींचा उल्लेख केलाच आहे.
अरे हो एक सांगायचे राहिले.
अभ्यंकराच्या लेखात सायकलवरून ज्या मुलीला सायकल वरून पाडल्याचा उल्लेख आहे ती मीच होते आणि मीच लिमये सरांकडे तक्रार केल्यामुळे जयंतचे आय-कार्ड सरांनी काढून घेतले होते.
त्या काळात पुरूषोत्तम करंडक स्पर्धेत आणि वक्तृत्व स्पर्धेत भाग घ्यायला मिळाला आणि व्यक्तिमत्व अनेक अंगाने बदलत गेले.
फर्स्ट इयरला असतानाच नोकरी लागली १०.३० चे ऑफिस होते. त्यावेळी सरांनी लवकर क्लासमधून जाण्यास परवानगी दिली. अर्थात बुडालेल्या लेक्चर्सचा अभ्यास दुसऱ्या दिवशी

पूर्ण करण्याच्या अटीवरच.

त्यावेळी चक्क बांबुचे स्टेज बांधून सांस्कृतिक कार्यक्रम केले जायचे त्यात भाग घेऊन स्टेज वर वावरताना काय भारी वाटायचे. त्यावेळच्या शिव्यांचे आवाज अजून कानात आहेत.

कुठल्या तरी नाटकांत माझं वाक्य होत.

मी मूग गिळून गप्प बसले.

पुढून आवाज आला होता मटकी का नाही गिळली?

स्टॅटिस्टीकच्या तासाला मला तर काहीच कळायचं नाही. श्याम, मीना ह्यांच्याबरोबर स्टॅटिस्टिक शिकताना माझ्यामध्ये इतका कॉम्प्लेक्स आला की, ये अपने बसकी बात नही म्हणतं. मी सपशेल माघार घेऊन कॉस्टिंग घेतलं होतं. वाळूचे ढीग टाळत कॉलेजमध्ये जाणे, गळणाऱ्या छताखाली बसून पावसाच्या पाण्यासाठी ठेवलेल्या बादल्या टाकून वर्गात बसून शिकणे, पेपर फुटल्यामुळे घडलेली गोकाकची ट्रीप, एनएसएस मध्ये केलेले श्रमदान हे तर मनातले अत्यंत प्रिय कप्पे.

हल्ली व्हॉटस्अपवर 'तिसरी इनिंग कशी जगा' यावर बरेच उपदेशपर विचार येत असतात. ते वाचून मला वाटतं आपण अजून म्हातारे कुठे झालो आहोत? पण आयुष्याच्या सुरूवातीलाच मिळालेली उत्तरे मिळालेले शिक्षण आणि मित्रांची मिळालेली साथ ह्यामुळे आयुष्य खूप आहे. त्या सगळ्या बद्दल मनात कायम कृतज्ञता असेल.

मंगेश पाडगावकर साहेब म्हणतात तसं, 'येत म्हटलं की येत म्हातारपण.

घेरू म्हटल की घेरू लागत म्हातारपण, तरूण असलो की तरूण असत म्हातारपण, रडत बसलो की करूण असत म्हातारपण' आणि म्हणूनच मंडळी चिल मारू या आणि मजेत राहू या.

**लता कुबेर गुर्जर**

—— × × × ——

# जे आठवते ते ! आणि तितकेच !

**श्रीकांत गद्रे**

पन्नास वर्षांपूर्वीचे काहीतरी आठवणे आणि त्यावर एक लेख लिहिणे जरा कठीण काम होते. पण प्रयत्न केला आहे.

मॅट्रीकची परीक्षा झाली की पुढे शिकण्यासाठी कॉलेजमध्ये जायच असत, येवढेच काय ते ज्ञान. कोणत्या कॉलेजला जायच? कां? असा विचार सुध्दा केला नव्हता. बरोबरचा मित्र राजु बोडस म्हणाला मी मॉडर्नला नवीन कॉलेजात प्रवेश घेणार आहे तू येणार का? हो ! असं करून आम्ही मॉडर्नला पोहोचलो. तिसऱ्या चवथ्या मजल्याची स्लॅब पडत होती. सर्व कॉरीडॉर पाण्यात होता. पोर्चमध्ये कुरळ्या केसांचे एक गृहस्थ मनापासून धुम्रपान करीत होते. माझ्या डोक्यात विचार आला, ''आयला फारच मॉडर्न कॉलेज दिसतय.'' प्रवेश प्रक्रिया फारच सोपी होती. अर्ध्या तासात दोघांची ॲडमिशन झाली. आमच्या मागे बिरुदावी लागली कॉलेज सुंदर.

भव्य इमारत, मोठे वर्ग, पाहून बुजलो होतो. वर्गात मुले आणि मुलीही. त्याचं आकर्षण होतं. शाळेत वर्गात फक्त मुलेच होती. कॉलेजची सुरवात व्हायला थोडा वेळ होता. मधल्या कालावधीत एक शर्ट एक पॅंट शिवायला टाकली. बुट घेतले. पहिल्या दिवसानंतर ते मी कधी घातले नाहीत. पहिल्या दिवशी कॉलेजात जाताना आरशात पाहिले. बैलाला झूल चढवल्यासारख वाटलं. कॉलेज सात साडेसातला होतं. कित्येक वर्ष ही माझी पहाट होती. पहिल्या वर्षी माझ्याकडे सायकलसुध्दा नव्हती. कॉलेजात गेल्यावर लक्षात आलं बहुतेक सगळे माझ्यासारखेच. न्यूनगंड गेला. घरात एक लेडिज सायकल होती. पण त्या काळात लेडिज सायकल चालवण कॉलेज विद्यार्थ्याला कमीपणाच होत. चेष्टा होईल पेक्षा आपल्याला दुसऱ्याची करता येणार नाही. चारचाकीने येण फारच श्रीमंतीचे. मी लोअर मिडिल क्लासमधला. मी निर्णय घेतला सहा चाकीने चायच. टिळकरोड ते मॉडर्न असा पी.एम्.टी.चा प्रवास सुरू झाला.

आठवतो तो पहिला दिवस. पहिला तास. अकाऊंटन्सीचा ! प्रा. भावे वर्गात आले. ''मी तुम्हाला अकाऊंन्सटी शिकवणार आहे. असे म्हणत त्यांनी सुरवात केली ! What is Accountancy? व्हॉट इज बुक किपींग? आता इथून पुढे सगळ इंग्रजीतून शिकाव लागणार आणि परिक्षेत लिहावं लागणार. थोड दडपण आलं. पण समजत होतं म्हणून अडचण आली नाही. प्रा. भावे सरांच्या बोलण्याला एक ताल होता एक लय होती. शब्दांमध्ये एक स्वल्पविराम असायचा. त्याचा उपयोग नाटकात झाला.

आठवतात ते प्रा. रायकर इंग्रजीचे प्राध्यापक ओघवती वाणी आणि इंग्रजी भाषेची, त्यातील साहित्याची तोंड ओळख. सोशल ॲक्टीव्हिस्ट पुढे सरांची आणि माझी जेष्ठ मित्र म्हणून

चांगली मैत्री झाली. इंग्रजीत रायकरसर आणि मराठीत प्रा. भीमराव कुळकर्णी सरांबरोबर पुढे खूप सहवास झाला. प्रा. मिजार यांना मी टिळकरोडला खूप वेळा पाहिलेलं. त्यांच्या कुटुंबियांच टिळकरोडला 'संतोषभुवन' नावाच हॉटेल होत. आणखी एक शिक्षक आठवतात. मराठी चित्रपटातील धुमाळ नावाच्या सरासारखे दिसणारे. शिकवण्याचा फार अनुभव नसलेले बहुदा कुलकर्णी त्याचं नावं.

आदरयुक्ती भीती वाटणारे कॉलेजचे प्रिन्सीपॉल लिमये सर. सुटाबुटात, शिस्तीचे भोक्ते, चष्म्याआड कायम वटारलेले डोळे किंवा मला तसे वाटत असावेत. त्या काळी चुक झाली तर दंड करत असत. मला एकदा ५ रु. दंड झाला होता. कशासाठी आठवत नाही. अर्थात माझी आगाऊगीरी असणार हे नक्की. कॉलेज म्हटलं की त्याच्या सर्व प्रथांची सुरूवात करायची होती. माझा इंटरेस्ट नाटकाचा. पुरूषोत्तम करंकडमध्ये नाटक करायच किमान यंदा सहभागी व्हायच ही तीव्र इच्छा. लिमये सरांचा विरोध नव्हता. तसा पाठिंबाही नव्हता. पण शेवटी परवानगी मिळाली. स्पर्धेत नाटक बक्षीसपात्र होण्यापेक्षा ही परवानगी आजही मला सुरखावून जाते. सगळेच पहिल्या वर्गाचे. माझासकट सगळे नविन. अनअनुभवी.

एक एकांकिका निवडली. 'मी अनिकेत सहस्त्रबुध्दे' कोर्टरुम रामा होता. हळबे नावाची मुलगी एकच स्त्री कलाकार. तिच्या सवडीने तालीम केल्या. आता वाटत आपण फारच वाईट प्रयोग केला. भीमराव म्हणाले भाग घेणे महत्त्वाचे बक्षीस मिळवणे नाही. खूप लिहीण्यासारखे आहे. शब्द मर्यादा असतेच की !

या छोट्याशा लेखातून तुम्हाला ५० वर्षे मागे नेण्याचा माझा प्रयत्न आहे. हा माझा छोटाशा लेख वाचून मी मात्र आठवणीत रमलो. तुम्ही सारे रमला असाल तर ते मला करा कळणार?

मी नू.म.वि. चा विद्यार्थी. शाळा आणि कॉलेजमधील शिक्षकांनी आणि माझ्या बरोबरीच्या विद्यार्थ्यांनी माझ्यावर खूप संस्कार केले. म्हणून आजही मी विद्यापीठात शिकवतो. आजही काही विद्यापीठाचे कोर्सेस घेतो. गाईडन्स देतो. सर्व गुरुजनांना थँक्स देऊन मी त्यांचा अपमान करू इच्छित नाही. पण त्यांना मनापासुन नमस्कार करतो.

**श्रीकांत गद्रे**



# .... आणि गाडी रूळावर आली...

हेमंत मोरगांवकर

साधारणपणे जून/जुलै १९७३ चा प्रसंग आहे. आपल्या गोसावी सरांनी कॉमर्स असोशियनच्या तर्फे एक सेमिनार करायच ठरवलं. मला सगळ्यांनी त्यात भाग घेण्यासाठी घोड्यावर बसवायचं ठरवलं. शाम वाघ,रविन्द्र गुर्जर व सर ह्या मंडळींनी माझ्याकडून तयारी करून घेतली. विषय होता ''बँक राष्ट्रियीकरण'' साधारण १० मिनट बोलायचं होत. सर्व तयारी झाली आणि सेमिनारचा दिवस उजाडला. सभागृहामध्ये सर्व विद्यार्थी आणि प्राध्यापक जमले आणि माझ नाव उच्चारल गेलं. मी स्टेजवर आलो समोर येवढी लोक बघितली; आणि माझ्या तोंडातुन शब्द बाहेर फुटेना. मी सुरवात केली. ''सन्माननीय गुरूजन आणि माझ्या विद्यार्थी मित्रांनो....'' एवढ म्हटलं पण काही सुधरेना. १-२ मिनट शांतता. गोसावी सरांनी थोडा धीर देण्याचा प्रयत्न केला. शेवटी मी सॉरी म्हटलं आणि स्टेजवूरन खाली आलो. सर्वांनी माझ्यावर जी मेहनत घेतली होती. त्याच्यावर मी पाणी ओतलं होतं. मी दुसऱ्या वर्गात गेलो आणि मला रडू कोसळले. सर्व मित्र मंडळी मला धीर देण्यास व सावरायला आली.मी विचार करत होतो, एवढं पाठांतर झालं, मग कुठे माशी शिंकली... या प्रसंगातून एक शिकलो की जरी तयारी झाली असली तरी थोडा कॉन्फिडन्स दाखवून पुढे जाणे आवश्यक होतं. हार मानून मागे राहायचं नाही, खूप काही शिकवून गेला हा प्रसंग.

दुसरी एक छान आठवण. १९७३ मध्येच आपल्या कॉलेजमध्ये 'नाट्य .प्रशिक्षण'' शिबीर भरलं होत. डॉ. वि.भा. देशपांडे सरांनी पुढाकार घेऊन आयोजित केलं होतं. श्री. अमोल पालेकर व चित्रा पालेकर एक आठवडा हे शिबीर घेणार होते. मला नाव नोंदणी करायला थोडा उशीर झाला. त्यामुळे मला प्रवेश नाकारला गेला. मला खूप बाईट वाटलं. १९७० पासुन पुणे मराठी ग्रंथालय नाट्य शाखेमध्ये मी थोडी फार उमेदवारी करत होतो. तसचं गणपती उत्सवामध्ये माझ्या मित्राच्या वाड्यात आम्ही हौशी लोक नाटक बसवत होतो. त्या शिबीराचा मला नक्की उपयोग झाला असता. काय करावं काही सुचत नव्हतं. शिबीराच्या पहिल्या दिवशी मी वर्गाच्या बाहेर उभारून खिडकीतुन बघण्याचा प्रयत्न केला. तेव्हा माझ्या लक्षात आलं कि हे जमतंय. मग मी रोज खिडकी बाहेर उभा राहुन सर्व शिकून घेतलं. असा माझा एकलव्याप्रमाणे शिकण्याचा प्रयत्न चालू होता. त्यांनी स्टेपस् सांगितल्या मी त्या बाहेर करून बघायचो. शेवटच्या दिवशी चित्रा पालेकरांनी हे सगळं बघितलं आणि मला आत येण्यास सांगितलं. मला मनापासुन आनंद झाला. ते जे काही मी शिकलो त्याचा मुला पेढे टेल्को कलासागर च्या प्रवासात खूप उपयोग झाला.

या माझ्या 'मॉडर्न' मधील सर्व शिक्षणाचा पुढे टेल्को मधील वाटचाली मध्ये प्रचंड उपयोग

झाला. मी अगदी सामान्य विद्यार्थी होतो. ४५-५०% मार्क मिळवणारा एक विद्यार्थी. गोसावी सर, शाम वाघ, रविंद्र गुर्जर, लता कुबेर व इतर मित्र मंडळींनी खूप समजून सांगितले आणि अभ्यासाचं महत्त्व पटवून दिलं. नुसतं पटवून दिलं नाही तर त्यांच्या बरोबर बसवून माझ्याकडून अभ्यास करून घेतला. त्याचा परिणाम ४५-५०% मार्क मिळवणारा मी एकदम ६५-७०% पर्यंत मजल मारू शकलो.

परीक्षा झाल्यावर आमचे कॉस्टिंग चे प्राध्यापक श्री. पारखी सर (ते Wanson India मध्ये फायनान्स हेड होते.) ह्यांनी मला Wanson India मध्ये नोकरी करणार का असं विचारलं. माझं सिलेक्शन झालं आणि नोकरी सुरू झाली. अजुन रिझल्ट लागायचा होता. पुढे अशी घटना घडली की टेल्को कंपनीने 'ग्रॅज्युएट ट्रेनी' पदासाठी भरती सुरू केली. त्यासाठी कॉलेजमधून नावं मागितली होती. त्यात माझं नाव गोसावी सरांनी इन्क्लुड केले. मी मुलाखतीला गेलो. पुण्यातील सर्व कॉलेजेस मधुन एकूण ९० विद्यार्थी मुलाखतीला आले होते. त्यातुन फक्त दोन उमेदवार त्यांनी निवडले. मला सांगायला अभिमान वाटतो की ते दोन्ही उमेदवार आपल्या कॉलेजचे होते. हेमंत बेरी आणि अस्मादिक. आणि मग आम्हा दोघांना एक वेगळीच दिशा मिळाली. ४० वर्ष टेल्को परिवारात राहून आमची वाटचाल अत्यंत सुंदरपणे आणि यशस्वी पार पडली. हा अनुभव सर्व अर्थांनी समृध्द करणारा ठरला. आज आम्ही जे काय आहोत ते फक्त आणि फक्त ह्यामुळंच. मॉडर्न चा परिवार आणि परमेश्वराच्या आशिर्वादामुळेच हे शक्य झालं. आज आमचा मॉडर्नचा मित्रपरिवार फक्त मित्रपरिवार न उरता एक एक्सटेंडेड फॅमिली झाला आहे. बायका, मुलं, जावई, सुना, नातवंड ह्याचा भाग बनली आहे. आयुष्यात अजुन काय हवं? आपल्या सर्व मित्र परिवाराला परमेश्वराचा आशिर्वाद असा लाभो ही त्या ईश्वरचरणी प्रार्थना.

**हेमंत मोरगांवकर**

———×××———

# सुखद आठवणी

**सौ. रंजना (पिकले) कसबेकर**

मॉर्डन हायस्कूलमध्ये शिकताना शाळेच्या भव्य मैदानावर कॉलेजची इमारत उभी रहात होती. आपल्या शाळेचे कॉलेज उभे रहातेय याचा अभिमान व आपलेपणा होता. १९७० साली एस.एस.सी. (इ. ११ वी) झाल्यावर यामुळेच कॉलेजमध्ये कॉमर्ससाठी ॲडमिशन घेतली. ''सुरक्षित शाळेतून सुरक्षित कॉलेजमध्ये प्रवेश करणार'' म्हणून आमचे पालकही निर्धास्त होते.

नवीन कॉलेजची नवीन इमारत, नवीन विद्यार्थी सारे काही नवीन ! रँगिंगचा र' ही आम्हाला माहित नव्हता. ना कधी अनुभवला.

प्राचार्य श्री. लिमये सरांची शिस्त व करारीपणा नेहमीच लक्षात राहिला. श्री. गोसावी सर तळमळीने शिकवत त्यांचा ॲक्टिव्हपणा पाहून उत्साहित वाटायचे श्री. रायकर सरांनी इंग्रजी विषयाची गोडी वाढवली. श्री. महाजन सरांनी कधीही पुस्तक न उघडता शिकवले आणि ईकॉनॉमिक्स हा विषय इंटरेस्टिंग केला. सर्व प्राध्यापकांना नमूद करणे शक्य नाही, पण सर्वांनी सर्व विषय उत्तम शिकविले, सर्वांशी पर्सनल टच निर्माण झाला.

नवीन मित्र, मैत्रिणी भेटले, कॉलेजची ४ वर्षे कशी संपली, कळलेच नाही. सर्व क्लासमेटसनी वेगवेगळ्या क्षेत्रात यश संपादन करून आपली बॅच किती परीपूर्ण झाली आहे. याचा आनंद व अभिमान आहे.

सर्व प्राध्यापकांना मन:पूर्वक धन्यवाद. सुवर्णजयंती साजरी करताना प्रोग्रेसिव्ह एज्यूकेशन सोसायटी व मॉडर्न कॉलेजचा निश्चितच अभिमान वाटतो.

मी १९९८ मध्ये पुणे सोडले. आज या सोहळ्यासाठी सर्व मंडळी एकत्र येणार भेटणार ही कल्पनाच सुखदायी आहे.

श्री. शाम वाघ व त्यांच्या टीमने पुढाकार घेऊन या सोहळ्याचे आयोजन केल्याबद्दल मन:पूर्वक धन्यवाद, हा सोहळा यशस्वीरितीने पार पडणार यात शंकाच नाही.

Wishing Modern College Many More Jubilee Years.

"All the Best"

**सौ. रंजना (पिकले) कसबेकर**

# मॉडर्न आमचे, आम्ही मॉडर्नच्या

**सुरेखा वाळवेकर**

आम्ही मैत्रिणींनी मॉडर्न हायस्कूल झाल्यावर मिळूनच मॉडर्न महाविद्यालयात प्रवेश घेतला. मॉडर्नच्याच शाळेतून आल्यामुळे कॉलेजमध्ये म्हणजे मॉडर्न शाळेमध्ये असल्यासारखी आमची मानसिक भावना होती. तरीही नवीन महाविद्यालय आणि आमची पहिलीच बॅच. त्यामुळे विद्यालय आणि विद्यार्थी वर्ग यांचा विकास एकत्रपणेच चालला होता. आमचे प्राचार्य व सर्व प्राध्यापक सर्वच उत्तम होते आज आम्ही काही आहोत, त्याचे श्रेय या सर्वांनाच आहे. पन्नास वर्षानंतर परत कॉलेजमध्ये जायचे आणि सर्वांना भेटायचे, म्हणून खूप आनंदात आहे. अर्थात याचे श्रेय शाम आणि या मेळाव्यासाठी झटणाऱ्या साऱ्यांनाच खऱ्या अर्थाने आहे. यात दुःख फक्त एकच आहे. भारती शहा या मैत्रिणीला आपण सारे भेटू शकत नाही. कारण ती फारच लवकर अनंताच्या प्रवासाला तिच्या खिळाडूपणानुसार सर्वांना मागे टाकून आधीच खूप खूप अंतरावर आणि न परतीच्या वाटेवर निघून गेली आणि गंमत बघा ना ! आपण सारे तिला समक्ष उभे करून रागावूही शकत नाही. अर्थात् कुणालाही राग यावा अशी नव्हतीच कधीही ! तरीही मॉडर्न आमचे आणि आम्ही मॉडर्नच्या हे अविस्मरणीय आहे.

**सुरेखा वाळवेकर**



# कलावंताची पायाभरणी

**शामकांत सुतार**

मॉडर्न महाविद्यालय, आपलं कॉलेज, आपली ज्ञानभूमी, शिवाजीनगर, घराजवळचं कॉलेज म्हणून प्रवेश घेतला. त्यावेळी इमारतीचं बांधकाम सुरू होत हळूहळू तिला मनोवेधक स्वरूप येत गेलं. एफ.वाय., एस.वाय., टी.वाय. या तीन वर्षे कशी आनंदात गेली ते कळलचं नाही. कारण सोबतीला होती जीव लावणारी मित्रमंडळी. एकमेकांच्या आयुष्यातले आनंदाचे सोनेरी क्षण, विचारांची देवाणघेवाण, एकमेकांच्या अडचणी सोडविण्यासाठी केलेली धडपड आणि मदत. अगदी इतके वर्षानंतर अजूनही स्पष्टपणे आठवतयं.

कॉलेजच्या इमारतीचं प्रशस्त प्रवेशद्वार. तिथं घटकाभर थांबून नोटिस बोर्डातील नोटिसा वाचून झाल्या की, ठरायचं कोणते पिरियडस् अटेंड करायचे; कारण समोरच खुणवत असायचं कॉलेजचं मोठ्ठं ग्राऊंड आणि टोकाला असणारा एका झाडाभोवतालचा कट्टा तिथचं गप्पाटप्पा, मिटिंग्ज् व्हायच्या.

दरवर्षी कॉलेज सुरूं झालं की वेध लागायचे निवडणुका, त्यानंतरची ठरलेली लोणावळा खंडाळा पावसाळी ट्रीप, फुल्ल धम्माल, सोबत वर्गातली सर्व मित्रमैत्रिणी, तो लोकलचा प्रवास आणि पावसाळ्यातलं घाटामधलं फिरणं आणि माझ्या खिशातला छोटासा माऊथ ऑर्गन. त्यावर वाचवलेली मस्त गाणी आणि माझं झालेलं कौतुक. इथूनच तर सुरू झाली माझी कलाकार बनण्याची वाटचाल आणि आता एक यशस्वी कलाकार, परफॉर्मर, विद्यार्थी घडवणारा गुरू आणि मेलडीज ऑन माऊथ ऑर्गन या बॅनरचा सर्वेसर्वा. खूपच छान. पण पायाभरणी झाली होती आपल्या कॉलेजमध्ये. आपल्या सर्वांवर ज्ञानाचे सकस संस्कार करणारे गुरूजन म्हटले की आठवतात सर्वांवर मुलांप्रमाणे प्रेम करणारे श्री. मो.भा. लिमये सर, रायकर सर, संगोराम सर, गोसावी सर, पाथरे सर त्यांची शिकविण्याची सुंदर पध्दत, त्या आठवणींनी मन अजूनही हळवं होत. त्या सर्वांनी आपल्यामध्ये शिस्त, वक्तशीरपणा, अभ्यासूवृत्ती जागवून आपल्या सर्वांच्या आयुष्याचा पाया भक्कम केला.

अभ्यासाबरोबरच खेळामध्ये आपल्यापैकी काही विद्यार्थ्यांनी भाग घेतला आणि आपल्या कॉलेजचे नाव उज्ज्वल केले. उदा. श्रीरंग इनामदार तर काही विद्यार्थ्यांनी मोठमोठ्या पदांवर कार्यरत राहून आपल्या महाविद्यालयाचे नांव उच्च शिखरावर नेले. मलासुध्दां बेस बॉल या खेळप्रकारांत आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत भाग घेऊन शरीरसंपदा उत्तम राखण्यास मदतच झाली.

आपल्या महाविद्यालयांतील अभ्यासानंतरचा आमचा आवडता कोपरा म्हणजे आर्ट सर्कलची त्यावेळी F रूम. कॉलेजमधील संगीतावर प्रेम करणारी आणि वेगळं काहितरी करून दाखविण्याची कलाकार मंडळी वेळ मिळाला की या F रूममध्ये एकत्र येऊन सांगितीक

कार्यक्रम, नृत्य वगैरे गोष्टीची तयारी करायची ते वार्षिक स्नेहसम्मेलनामध्ये भाग घेऊन आपल्यातलं काहीतरी वेगळेपणं दाखवायच्या हेतुनेच. मी सुध्दां त्यातला एक. आमची ही सांगितिक चळवळ प्राचार्य मो.भा. लिमये यांच्या लक्षांत आल्यानंतर त्यांनी आमच्या मागणीप्रमाणे आवश्यक असणारी वाद्ये खरेदी करून दिली आणि आपल्या कॉलेजचा आर्ट सर्कल ग्रुप तयार झाला. प्रथम महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाच्या महाबळेश्वर येथील पर्यटन स्थळावर सलग तीन कार्यक्रम करण्याचा मान आम्हां कलाकार विद्यार्थ्यांना मिळाला.

यामधून सांगितिक कार्यक्रमाचे आयोजन, सादरीकरण आणि नियोजन या सर्वांचा पाया माझ्या आयुष्यांत आपल्या मॉर्डन महाविद्यालयाने भक्कमपणे तयार केला. त्यामुळे पुणे विद्यापीठाच्या सेवेत असतानाचे कार्यक्रमातील वाद्यवृंदरचना सर्वांना बरोबर घेऊन कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात यशस्वी झालो.

निवृत्त झाल्यानंतरचा प्रत्येकाचा कालखंड त्याच्या आयोजनाप्रमाणे व्यतीत होत असतो. परंतु माझ्यामध्ये असलेल्या कलागुणांना चेतना मिळाली ती आपल्या मॉर्डन महाविद्यालयामध्येच म्हणून निवृत्त झाल्यानंतर माझे माऊथ ऑर्गन वाद्याचे कार्यक्रम यशस्वीपणे होत आहेत. नवीन विद्यार्थी तयार होत आहेत आणि प्रत्येजण आनंदात आहे आणि त्यांच्या समवेत मीसुद्धा सुरवांत, आनंदात उर्वरित आयुष्य आनंदाने जगतो आहे.

**शामकांत सुतार**

×××



# निष्कलंक पोलीस सेवा

**शिवाजी ज्ञानोबा निम्हण**

माझा जन्म पाषाण येथील लहानशा घरांत झाला. पुणे म.न.पा. इ. १ ली ते ७ वी पर्यंत शिक्षण झाले. त्यानंतर पाषाण येथे गणेश कुंभार हायस्कूल सुरू झाले. सदर गणेश कुंभार हायस्कूलची इमारतच नव्हती. सदर ठिकाणी दोन वर्षे आमचे वर्ग चिंचेच्या झाडाखाली भरत असत व पायथ्याच्या स्थानी बाजूच्या हनुमान मंदीरात शाळा भरत असे. आम्ही ८ वी व ९ वी मधील विद्यार्थ्यांनी श्रमदानाने ५ वर्ग तयार केले. त्यानंतर १० वी व ११ साठी आम्ही वर्गात बसू शकलो. ११ वी पास झाल्यानंतर मॉडर्न मध्ये प्रवेश घेण्यासाठी आलो. शाळेत मिळालेली क्रीडा व इतर २ क्षेत्रातील प्रमाणपत्रे घेवून मी प्रा. लिमये सरांच्या केबिनमध्ये प्रवेश केला. सरांनी मला क्रीडा क्षेत्रात महाविद्यालयाचे नांव उंचावले पाहिजे असे सांगितले. त्यानुसार 'कुस्ती'मध्ये मला द्वितीय क्रमांक मिळाला. त्यावेळी श्री. लिमये सरांनी मला केबिनमध्ये बोलावून माझे कौतुक केले.

सन १९७१ मध्ये आपण एफ.वाय.बी.कॉम मध्ये असतांना ८ वी मध्ये एबीसीडी शिकलो होतो. म्हणून बीएमसीसी कॉलेजात जाण्याचे ठरविले व तसा मी अर्ज दिला. त्यावर श्री. लिमये सरांनी मला बोलावून घेतले व मॉर्डन कॉलेज सोडू नकोस असे सांगितले. थोडा वेळ विचार करून मी ही मॉडर्न न सोडण्याचा निर्णय घेतला व इंग्रजी माध्यमातून शिकण्याचा निर्णय घेतला. माझा होकार ऐकून श्री. लिमये सरांनी मला सांगितले की, अभ्यासात कांही अडचण आल्यास श्री. गोसावी सरांचे मार्गदर्शन घेणे. त्यानुसार श्री. गोसावी सरांनी मला वेळोवेळी मार्गदर्शन केले.

सन १९७३ साली आपण S.Y.B.Com. मध्ये शिकत होतो. पुणे कँटोनमेंट मधील कार्यालयातून Service Selection Board (SSB) ची एक जाहिरात आली त्यात 'गार्ड सर्व्हिस कमिशन' मधून मिलीटरी मध्ये जावून देशाची सेवा करण्याची संधी प्राप्त होणार होती. मी पुणे येथील परीक्षेत पास झाल्यानंतर मला Banglore येथे मुलाखतीचा कॉल आला. त्याच दरम्यान S.Y.B.Com. ची परीक्षा होती. मी Call Letter घेवून श्री. लिमये सरांना भेटलो. सरांनी मला एक पत्र लिहून दिले, ते मी SSB ला पाठविले व मला मुलाखतीची पुढील तारीख मिळाली, त्यामुळे माझे कॉलेजचे वर्ष वाया न जाता मी मुलाखत देवू शकलो. बंगलोर येथील मुलाखतीसाठी अंतिम टप्प्यापर्यंत महाराष्ट्रातून मी एकटाच राहिलो होतो. परंतु थोड्याशा फरकाने माझी निवड झाली नाही. पुढे कांही अडचणींमुळे SSB ची परीक्षा देता आली नाही.

मार्च १९७४ साली B.Com. झालो. प्रथम हॅंडित कथिरा नंतर बी.जी. शिर्के कंपनी नंतर बँका, खाजगी कंपन्यात नोकऱ्या यानंतर 'पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेत' नोकरी केली.

खाकी वर्दीचे प्रचंड आकर्षण होते. माझा मित्र श्री. मुसा शेख व शहा यांच्या सहकार्याने पोलिस आयुक्तालयात नोकरी मिळाली. त्याने मला सन १९७७ मध्ये सुचविले की, एकदा PSI ची परीक्षा नाशिक वरून दे. मी त्याच्या सांगण्यानुसार नाशिक वरून फॉर्म भरला. श्री. मुसा शेख यांचे सिलेक्शन होऊन तो प्रशिक्षण (PSI चे) घेत होता. तेथेच मुसाचे वडील Inspector होते. व PTC नाशिक मध्येच ते रहात होते. मी नाशिक येथे परीक्षा देण्यास गेलो व आणखी एक महिना परीक्षा पुढे ढकलली म्हणून मी पुण्याला परत न येतां मुसो शेखच्याचच घरी राहून त्याच्या एका लहान भावासोबत (सितज शेख (ACP -Retd.) ) एक महिना परीक्षेची पूर्ण तयारी केली. ग्राऊंड आणि लेखी परीक्षेसाठी मला मुसाच्या कुटुंबियांचे अनमोल सहकार्य मिळाले. आजही आमचे बंधुत्वाचे नाते टिकून आहे.

सन ऑक्टो. १९७७ ते मे १९७९ पोलीस प्रशिक्षण महाविद्यालय नाशिक येथे यशस्वीरित्या प्रशिक्षण घेतले व सन जून १९७९ मध्ये मुंबई मध्ये पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत झालो. सन १९७९ ते ३०/५/२०११ पर्यंत मुंबई पोलीस दलांत नोकरी केली. पी.एस.आय., ए.पी.आय., पोलीस निरीक्षक, वरिष्ठ पोलीस निरीक्षक व शेवटी सहा. पोलीस आयुक्त म्हणून मुंबई पोलीस दलांत काम केले. पोलीस दलांतील माझी सेवा निष्कलंकपणे पार पडली. अनेक ठिकाणी काम केले. त्याबद्दल मा. वरिष्ठांनी प्रमाणपत्रे व बक्षीसे देवून कामाचा गौरवही गेला.

पोलीस दलांत काम करतांना अनेक वरिष्ठांनी कामाचे कौतुक केले. त्यात मी श्री. सदानंद दाते (सध्या पोलीस कमिशनर, नालासोपारा ठाणे) यांचा उल्लेख करावासा वाटतो. अत्यंत नि:स्पृह व कडक शिस्तीचे श्री. दाते साहेब अनेक अधिकाऱ्यांच्या चांगुलपणा बद्दल त्यांच्या शिस्तप्रियतेबद्दल व कामाच्या हातोटी बद्दल लिहू शकतो. पण तो वेगळा विषय आहे.

सेवानिवृत्तीनंतर श्री. गोसावी सरांना त्यांच्या घरी जावून भेटलो. त्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानले. सन २०१८ मध्ये आमच्या पोलीस ट्रेनिंग सेंटर मधील Batch Mates चे Get Together होते. मी, माझी पत्नी, माझी मुलगी व तिचा अडीच वर्षे वयाचा मुलगा यांचे सह श्री. लिमये सरांना त्यांच्या घरी भेटलो त्यावेळी श्री. लिमये सरांनी माझ्या अडीच वर्षे वयाच्या नातवाबरोबर डान्स केला. मला एकदम गहिवरून आले. मी आजही लिमये सरांच्या सतत संपर्कात आहे.

ज्यांनी मला मदत केली, मार्गदर्शन केले, त्या सर्वांचा ऋणी राहून राहिलेल्या आयुष्याचा प्रवास अत्यंत, आनंदाने व समाधानाने जगत आहे.

**शिवाजी ज्ञानोबा निम्हण**

सहा. पो. आयु. (सेवा निवृत्त)

# फजिती

**सुहास शहा**

आपल्या कॉलेजच्या माजी विद्यार्थ्यांचं gathering ठरलय कळल्या पासून माझ्या डोळ्यासमोरून कॉलेज मधल्या गमती-जमातींनी खूप आठवणी जागवल्या. परंतु, दोन ठळक घटना मला जेव्हा आठवतात तेव्हा तर मी स्वतःशीच हसतो तेव्हा सौ. ने किंवा मुलाने बघितले तर ते म्हणतात - काय ह्या माणसाला वेड तर नाही लागले? एकटाच स्वतःशी हसतोय!

त्यातली पहिली घटना आपल्या कॉलेजच्या पहिल्या दिवशीच घडली. नूमवितुन ११वी झाल्यावर कदाचित कडक शिस्तीच्या शाळेतून बाहेर पडल्याने असेल पण कॉलेजला जायच्या विचाराने मन मोहरून गेले होते. त्या दिवशी सकाळी नेहमी प्रमाणे लवकर उठून स्नानसंध्या आटपून कॉलेजला जायची तयारी करत होतो. आता तुम्ही म्हणाल लग्नाला किंवा कुठल्या समारंभाला थोडाच जाणार होतो! पण त्याला खास कारण म्हणजे शाळेमध्ये ११वी पर्यंत full pant कधी घातली नव्हती. कायम खाकी अर्धी चड्डी व पंधरा शर्ट. फुलपॅण्ट घालायला मिळणार म्हणून स्वारी खूप खुश होती. असो. तर निळा आकाशी रंगाचा हाफ शर्ट आणि नव्य ब्लू रंगाची फुलपॅण्ट घालून तयार झालो. मस्तकावर त्यावेळी सुद्धा खूप काही केस होते असे नाही. तरी ८-१० वेळेला भांग पडून सायकलवर निघालो. तेव्हा मला आठवते त्या प्रमाणे नूमवि मधले माझ्या घराजवळ कॉलेजला जाणारे कोणी मित्रच नव्हते. त्यामुळे स्वारी एकटीच सायकलवर टांग मारून निघाली. कॉलेजच्या मुख्य बिल्डिंगच्या समोर म्हणजे त्या वेळच्या ग्राउंड भोवती तारेचे कुंपण होते व त्यातूनच शॉर्ट कट काढून विद्यार्थी मुख्य बिल्डिंग मध्ये मला जाताना दिसले. मी पण इतर विद्यार्थ्यांसारखा तारेच्या कुंपणामधून वाकून जाऊ लागलो. आणि काय सांगू, तिथेच माझा नशीब आडवं आलं. कारण मी कुंपणाच्या अर्धाअधिक आत असताना कदाचित मी जास्त न वाकल्याने असेल किंवा कोणीतरी चुकून कुंपणाच्या तारा सोडण्यामुळे असेल, तर काही तारा माझ्या नव्या शर्ट मधे अडकल्या. व त्या गडबडीत माझा शर्ट मागून ३-४ ठिकाणी लक्षात येईल इतका फाटला. त्यामुळे त्या दिवशी तरी माझे कॉलेज ला जायचे स्वप्न भंग झाले व मी खूप उदास मानाने रडवेल्या चेहऱ्याने तसाच स्वतःची फजिती करून घरी परतलो.

माझी दुसरी फजिती मला आठवते त्या प्रमाणे SYBCom ला असताना एकदा मला कॉलेजला जायला खूप उशीर झाला होता. त्या दिवशी श्री पाथरे सरयांचा इकॉनॉमिक्स चा पहिला तास होता. इकॉनॉमिक्स माझा आवडीचा विषय असल्याने मी तो तास कधीच बुडवत नसे. पण त्या दिवशी उशीर झाल्याने सायकलवरून कसातरी धापा टाकत कॉलेजमधे आलो. त्या वेळी सायकल-स्टॅन्ड वर ३०-४० सायकली ओळीने लावलेल्या होत्या. मी

उशीर झाल्यामुळे म्हणा किंवा माझ्या धांदरटपणामुळे मला दोन सायकली मधल्या मोकळ्या जागेचा अंदाज न आल्याने जशी मी माझी सायकल घुसवली तश्या बाकीच्या सायकली एका मागून एक पडायला लागल्या. त्या वेळी पूर्वीची पुण्याची थंडी असून ही ते दृश्य बघून मी घामाघूम झालो आणि आता पुढे काय होणार ह्या विचाराने माझ्या डोळ्यासमोर काजवे चमकू लागले. मी घाई घाईने सायकलवरून उतरलो व काही घडलेच नाही अश्या अविर्भावात चालू लागलो. मला आता नक्की आठवत नाही पण एका वॉचमनने मला हटकले तसा माझा चेहरा एकदम कावराबावरा झाला व मला वाटले तो आता मला प्रिन्सिपॉल लिमये सरांकडे घेऊन जाणार. प्रिन्सिपॉल लिमये सरांबद्दल मला आदरयुक्त खूप भीती होती त्यामुळे माझी बोबडीच वळली. पण त्या क्षणी मला नशीबाने साथ दिली. वॉचमन एवढेच म्हणाला काय रे कॉलेजमधे आला आहेस पण आरश्यात बघून तरी शर्ट नीट खोचायचा! तर त्यावेळी असे झाले होते कि शर्ट पुढुन तरी व्यवस्थित खोचलेला होता पण सायकल चालवल्यामुळे बऱ्यापैकी पॅन्टच्या बाहेर आलेला होता. त्यामुळे मला एकदम हायसे वाटले आणि मी खुशीत वर्गामध्ये आलो. वर्गात आल्यावर कळले कि पाथरे सर काही कारणास्तव आलेच नव्हते. त्यामुळे वर्गात खूप दंगा चालू होता.

आज सुद्धा वरील प्रसंग आठवला तरी खूप हसू येते व माहित नाही त्या दिवशी मी किती सायकलींचे नुकसान केले. कॉलेज मधल्या अणेक आठवणींपैकी वरील दोन प्रसंगांनी झालेली माझी फजिती आज जरी आठवली तरी पुनः कॉलेजमधे गेल्यासारखे व त्यामुळे आणखीन तरुण झाल्यासारखे वाटते.

**सुहास शाह**



# उत्कृष्ट शिक्षकांचा सहवास लाभला

**शाम वाघ**

सन १९७० मध्ये मॉडर्न कॉलेज सुरू झाले. कॉलेज सुरू होण्यापूर्वी सोसायटीची शाळा होती. तिथूनच मी अकरावीपर्यंतचे शिक्षण मॉडर्न हायस्कूल मधूनच पूर्ण केले. त्यामुळे प्राथमिक शाळेपासून ते पदवीपर्यंतचे शिक्षण मॉडर्नमध्येच घेतलेला विद्यार्थी आहे. आमच्यावेळी ताटके सर जे मुख्याध्यापक होते, ते सोसायटीचे सेक्रेटरी होते. ताटके सरांचा कॉलेज सुरू करण्यामध्ये खूप मोठा वाटा आहे. त्यावेळी आमची पहिली बॅच होती. त्यामुळे सर्व हेड ऑफ द डिपार्टमेंट शिकवायला असायचे. लिमये सर, गोसावी सर यांच्यासारखे शिक्षक म्हणून आम्हाला लाभले.

ताटके सरांनी पुण्यातील सर्वोत्कृष्ट शिक्षक वर्ग इथे शिकवण्यासाठी नेमला होता. असा उत्तम शिक्षक वर्ग आम्हाला त्यावेळी शिकवण्यास होता. मी शालेय जीवनातही गुणवंत विद्यार्थी होतो. परंतु कॉलेजला गेल्यानंतर अधिकाधिक विकसित होत गेलो. पी.डी. ला असताना कॉलेजने आमच्या बॅचवर विशेष कष्ट घेतले होते. त्यावेळी हुशार मुलांचा असा स्वतंत्र गट तयार केला होता. त्यामुळे अधिकची पुस्तके, माहिती, कोचिंग वेगवेगळ्या ठिकाणाची माहिती दिली जात होती.

उत्कृष्ट शिक्षकांचा सहवास आम्हाला त्यावेळी लाभला, त्याचा फायदा पुढे बी कॉम पूर्ण केल्यानंतर 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, अहमदाबाद'मध्ये प्रवेश मिळवतांना झाला. आयआयएम्‌ला प्रवेशाची सर्व तयारी पदवीच्या काळातच झाली होती. त्यासाठी लागणारा आत्मविश्वास, अभ्यास या सगळ्या गोष्टी मला कॉलेजमध्येच मिळाल्या होत्या. आतापर्यंत आयआयएम्‌ अहमदाबादला निवड झालेला कॉलेजचा मी एकमेव विद्यार्थी असल्याचे मी अत्यंत अभिमानाने सांगू इच्छितो.

पुढे माजी विद्यार्थी म्हणून कॉलेजमध्ये स्पर्धा परीक्षेची तयारी सारखे अनेक उपक्रम राबवले. त्यातही माजी विद्यार्थी म्हणूनही सहभागी झालो. काही वर्षे कॉलेजमध्ये व्हिजिटिंग फॅकल्टी म्हणूनही शिकवले. आज माझ्या क्षेत्रात काम करत असताना सातत्याने कॉलेजने, शाळेने केलेल्या भक्कम पायाभरणीची आठवण येते. सुरुवातीच्या काळात आम्हा विद्यार्थ्यांवर घेतलेल्या कष्टाची जाणीव ठेवून आम्हीही पुढील पिढ्यांना मार्गदर्शन करण्याचे काम करत आहोत, ज्या ज्या वेळी कॉलेजमधून बोलावले जाते तेव्हा आवर्जून आम्ही तिथे जातच असतो.

त्यावेळी लिमये सर प्राचार्य होते, त्यावेळी जाणीवपूर्वक शिक्षकांना विद्यार्थ्यांकडे जास्तीत जास्त लक्ष द्यायला सांगितले, ती गोष्ट आम्ही कधीही विसरू शकत नाही. गोसावी सरांनी लिमये सरांकडून स्फुर्ती घेऊन हुशार मुलांचा गट तयार केला, क्लास व्यतिरिक्तही अधिक

वेळा ते आम्हाला देत, सातत्याने आमच्याशी बोलत असत, अनेक इनपुटस् देत असत. चिरपुटकर सरांचेही आम्हाला मोलाचे मार्गदर्शन लाभले.

बदलत्या काळानुसार नवनवीन अभ्यासक्रम कॉलेजमध्ये सुरू करण्याचे काम संस्था करत असते. त्यामुळे नावाप्रमाणेच सातत्याने प्रगतीच्या दिशेने संस्थेची वाटचाल सुरू असलेली दिसून येते. संस्थेचा नाव लौकिक मोठा असल्यामुळे शहराबाहेरील अनेक विद्यार्थी शिकण्यासाठी मॉडर्नला प्राधान्य देताना दिसतात. क्रीडा, सांस्कृतिक, शैक्षणिक अशा सर्व स्तरावर कॉलेज कायम अग्रेसर असलेले पहायला मिळते.

**शाम वाघ**

×××



# मंतरलेले दिवस

**सुरेशचंद्र पाध्ये**

माझे आजोबा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नाधवडे येथील सर्वश्रेष्ठ गणले गेलेले वैद्य. काका प्र.भा. पाध्ये (काका) आणि वडिल म्हणजे पिताश्री नाना (डॉ. एस.बी. पाध्ये) हे दोघेही नामांकित डॉक्टर, स्वाभाविकच मीही डॉक्टरच व्हावे अशी कुटुंबियांची इच्छा होती. त्यामुळे पुण्यातल्याच (माझे आधीचे शिक्षण त्रिस्थळी सारखे) न्यू इंग्लिश स्कूल रमणबागेतून एस.एस.सी. झाल्यावर माझी रवानगी एम.ई.एस. कॉलेजच्या शास्त्र शाखेत करण्यात आली होती, पण डॉक्टरीकडे वळायचे नाही, असे माझ्या मनाने आधीच ठरवलेले असल्याने पी.डी. सायन्सच्या पहिल्या सहामाही परीक्षेत मला प्रथम श्रेणी मिळाल्यामुळे मी धास्तावून गेलो आणि परिणामतः पी.डी. सायन्सला मी चक्क (ठरवून) नापास झालो. मग खूप चर्वितचर्वण होऊन. 'सायन्स नको असेल तर किमान कॉमर्सला जाऊ दे', असा फैसला घरच्या मोठ्या मंडळींनी केला. त्यावेळी बी.एम.सी.सी. हे प्रख्यात वाणिज्य महाविद्यालय होते. तेथे वशिलाही होता, पण वशिल्याचा वापर न करण्याचे उत्तम काम संबंधित अधिकाऱ्यांनी केल्यामुळे मला त्यावेळी नव्यानेच सुरू होत असलेल्या 'मॉडर्न कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स'च्या शिवाजीनगर या पुण्याच्या उपनगरीतील महाविद्यालयात प्रवेश घ्यावा लागला आणि त्यामुळेच माझे भाग्य उजळले.

'भाग्य उजळले' असे अशासाठी म्हणतो की कॉलेज नवे असल्यामुळे ते जे विद्यार्थी चांगले काही करील त्याला भरपूर प्रोत्साहन कॉलेज देत असे. 'साहित्य, कला आणि सस्कृती' या विषयांची विशेष आवड असल्याने अर्थातच त्या क्षेत्रांत काहीतरी करून दाखवण्याची संधी मला कॉलेजने दिली आणि तिचा मी पुरेपूर वापर करून घेतला.

थोडेसे विषयांतर करून एक किस्सा सांगतो, ते एफ.वाय. कॉमर्सचे वर्ष होते. (त्याच वर्षी मी 'दैनिक विशाल सह्याद्री'मध्ये बातमीदारी सुरू केली. त्यावेळी मला पहिला पगार खूप आर्जव केल्यानंतर मिळाला होता. तोही पाच रूपये फक्त) आता पुन्हा मूळ विषयाकडे वळू या.

मी 'मॉम' या कॉलेजच्या हस्तलिखित भित्तिपत्रकाचा संपादक होतो. कदाचित माझ्या पत्रकारितेची बीजे तेथेचे रोवली गेली असावीत. त्याचबरोबर मी विद्यार्थ्यांच्या अघोषित संघटनेचे अघोषित नेतृत्व करत असे. स्वाभाविकच कॉलेजच्या तिन्ही शाखांमधल्या मुला-मुलींशी माझी मैत्री होती आणि त्याचबरोबर सर्व प्राध्यापकांशीही चांगले संबंध होते. कोणत्याही मुलीशी कोणी बेअदबीने वागताना दिसला, तर आम्ही त्याला व्यवस्थित बुकलून काढत असू माजी महापौर भाऊसाहेब शिरोळे यांचा मुलगा विनय, सांडभोर, आचरेकर, निवृत्ती पाटील तसेच भाजपचा खासदार असलेला अनिल शिरोळे आदि सारे पुणेकर व

पुण्याबाहेरून आलेले आम्ही मित्र यात आघाडीवर असायचो. कॉलेजचे कोणतेही कार्यक्रम त्यावेळी आमच्याशिवाय होत नसत. प्रत्येक कार्यक्रमात माझा नियोजनात खारीचा वाटा असायचाच. मीनिर्वाचित डिबेटिंग सेक्रेटरी होतो. पण वर्गामधली माझी उपस्थिती बेतास बातच असायची. परिणामी त्यावर्षीच्या पहिल्या टर्मनंतर परीक्षेच्या निकालासोबतच प्राचार्य मो.भा. लिमये यांच्या सहीचे एक पत्र घरी येऊन थडकले. मी परीक्षेत जरी बरे गुण मिळविलेले असले तरी अनुपस्थिती ही अयोग्यच होती. पण इतक्या साऱ्या इतर उचापती केल्यावर माझ्या अनुपस्थितीकडे गांभिर्याने पाहू नये, अशी माझी त्योवळची भाबडी अपेक्षा होती. पण लष्करी शिस्तीच्या प्राचार्यांना हे मान्य होणे शक्य नव्हते आणि म्हणूनच त्यांनी पालकांना सावध करणारे पत्र घरी पाठवले व माझी वर्गातील उपस्थिती कमी असल्याचे कळवले. दोन्ही पत्रे नेमकी माझ्याच हाती पडल्याने पालकांपर्यंत ते पत्र पोहोचलेच नाही. मी मात्र यातून योग्य तो धडा घेतला. कॉलेज सुरू होताच मी जी अभ्यासेतर कामे करत होतो. त्यातून अंग काढून घेतले. डिबेटिंग सेक्रेटरी या पदाचाही राजीनामा देऊन मोकळा झालो. पहिले काही दिवस काहीच घडले नाही, पण नंतर कॉलेजच्या अभ्यासेतर स्पर्धादी गोष्टी सुरू होताच माझी अनुपस्थिती सर्वांना जाणवू लागली, कारण मी वर्गातील उपस्थिती अत्यावश्यक बनवली होती. अशाच एकदा मधल्या सुट्टीत 'प्रोफेसर्स कॉमन रूम'समोर उभा राहून मी कोणातरी प्राध्यापकांना शंका विचारत थांबलो असतांना प्राचार्य लिमये सरांनी मला पाहिले व कॉलेजचे तास संपल्यावर मला केबिनमध्ये येऊन भेट असे सांगून ते निघून गेले. मी त्यांना भेटल्यावर प्रथम त्यांनी तू डिबेटिंग सेक्रेटरीपदाचा राजीनामा का दिलास, असा प्रश्न विचारला. मी त्यांना आपण घरी पत्र पाठवल्यामुळे मी यापुढे कॉलेजच्या कोणत्याही अवांतर बाबींत भाग घ्यायचा नाही, असे मला पालकांनी सांगितल्याचे ठोकून दिले. त्यावर त्यांनी, ''मी तुझ्या वडिलांना पत्र देतो, पण तू तुझे पूर्वीचे सगळे काम नियमित उपस्थितीतसह चालूच ठेव'' असे सांगितले.

माझी मात्र त्यामुळे चांगलीच पंचाईत झाली, कारण मी पत्र पालकांना दाखवलेच नव्हते. त्यामुळे मी तत्काळ राजीनामा मागे घेण्याची तयारी दाखवली. ते म्हणाले, ''पत्र पाठवले, हे माझे चुकले, असा तुला वाटते का? पण अभ्यासेतर गोष्टी करतांना, ज्यासाठी आपले पालक फी भरतात त्या वर्गांना उपस्थित राहणे हे आपले कर्तव्य आहे, असे तुला वाटत नाही का?'' असा बिनतोड प्रश्न विचारल्यावर मी अर्थातच यापुढे वर्गात उपस्थित राहूनच बाकीच्या गोष्टी करीन असे सांगून माझी सुटका करून घेतली. विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास व्हावा, पण त्यांनी अभ्यासात मागे राहू नये ही प्राचार्य लिमयांची कळकळ मला भावली व मग त्याप्रमाणेच मी वागलो. प्राचार्य लिमये हे असे शिक्षक होते.

त्यांचा दरारा एवढा की ते पोर्चमध्ये दिसताच कॅन्टिनमध्ये आणि मैदानात बसलेली पोर सूंऽऽबाल्या करायची; पण कोणी त्यांना काही विशेष कर्तृत्व गाजवताना दिसला की त्याचे कौतुकही करायचे.

मला आठवणारी आणखी एक गोष्ट सांगायला हवी. तेव्हां प्रा. शिधये हे पी.टी. इन्स्ट्रक्टर होते. प्रा. किरण लागू नंतर आलेत. मी एकटाच संपूर्ण कॉलेजमध्ये पी.टी. लीडर म्हणून काम करत होतो. एकीकडे ही अभिमानाची बाब होती; पण दुसरीकडे सर्वच कामे एकट्यालाच करायला लावली जातात, हे अन्याय्य वाटत होते. एकदा प्राचार्य लिमये सर मैदानात आले असताना त्यांच्या ही गोष्ट न सांगताच लक्षात आली. त्यानंतर एक महिला पी.टी. लीडर व आणखी एक मुलगाही पी.टी. लीडर म्हणून नियुक्त झाला. कालांतराने मी पी.टी. लीडरचं माझं काम थांबवलं व त्यानंतर काही दिवसांनीच प्रा. शिधये यांनी पी.टी. इन्स्ट्रक्टरचं काम सोडून स्वत:ची रिक्षा सुरू केली. विद्यार्थ्यांचे हित हे प्राचार्य लिमये यांनी कधीही नजरेआड केले नाही, हेच ही बाब सांगते.

प्रा. भीमराव कुलकर्णी हे मराठी उत्तम शिकवत. तसेच प्रा. वि.भा. देशपांडे हेही आम्हाला मराठी शिकवायला होते, असे स्मरते; पण ते नाट्य समीक्षक म्हणून अधिक ज्ञात होते. कॉलेजमध्ये मात्र माझ्या आठवणीनुसार 'पुरूषोत्तम करडंक नाट्य स्पर्धेसाठी निवड झाल्यानंतर आम्हाला प्रा. श्यामला वनारसे यांनी केलेले मार्गदर्शन स्मरते.

आमच्या वर्गातले शाम वाघ, रविंद्र गुर्जर, प्रतिभा कान्हेरे, लता कुबेर, शरद रायरीकर, बोडस अशी अनेक हुशार मुले होती. शामकांत सुतारासारखा उत्तम माऊथ ऑर्गन वादक व गायक कलाकार होता. निवृत्ती पाटील हा चाळीसगावचा कष्टाळू मुलगा होता. तो, मी व भालचंद्र गाडे हे तिघेजण परीक्षेच्या आधीचा आठवडा रात्रंदिवस त्याच्याच खोलीवर अभ्यास करून बऱ्यापैकी गुण मिळवून पास होत होतो. मात्र माझे त्यावेळचे एक गुपित होते. आताच्या मुलांना ते किती उपयोगाचे आहे याची कल्पना नाही, तरीही सांगतोच.

मी वर्षभर भरपूर उनाडक्या करून अभ्यासेतर बाबतीत अधिक रस घेत असे. वर्षाच्या शेवटच्या महिन्याच्या प्रारंभी गत पाच वर्षाच्या प्रश्नपत्रिका मिळवायच्या, त्या प्रत्येक प्रश्नपत्रिकेत काही विशिष्ट प्रकरणावरचे (कोणताही विषय असला तरी) पाच प्रश्न असायचेच. एखादे प्रकरण गत परिक्षेत प्रश्नासाठी विचारात घेतलेले नसायचे. ती पाच व हे सहावे अशी सहा प्रकरणे किमान पाच वेळा वाचून त्यावरचे प्रश्न सोडवायचे आणि निर्धास्तपणे परीक्षा द्यायची. उत्तम जरी नाही, तरी बऱ्यापैकी गुण मिळायचे आणि पुढच्या वर्गात नक्की जायचो या बाबीचा उपयोग मला पुढे आयुष्यभर लिहिण्याचे विषय निवडताना झाला हे महत्त्वाचे!

प्राचार्य लिमये यांच्याप्रमाणेच प्रा. गोसावी, प्रा. भावे, प्रा. मिजार, प्रा. पाथरे, प्रा. किरण लागू, प्रा. कुलकर्णी, प्रा. मुकुंद महाजन, प्रा. वि.भा. देशपांडे अशी अनेक नावे आहेत. प्रा. एम.ए. कुलकर्णी हे अभिनेते धुमाळसारखे दिसत. त्यांना सारे धुमाळच म्हणत. एकदा त्यांना यायला थोडा उशीर झाला तेव्हा मुलांच्या गप्पा रंगल्या होत्या. त्याचवेळी प्राचार्य लिमये वर्गावरून गेले व तास संपताच काही मुलांना प्राचार्यांनी बोलावण्याचे निरोप आले. त्यात मीही होतो. आम्ही सारे त्यांच्या दालनात मान खाली घालून उभे होतो. सरांनी विचारले ''आता थोड्या वेळापूर्वी मी तुमच्या वर्गावरून गेलो. तुम्ही बोलत होतात. सर यायचे होते; कोणाचा तास होता? सारे एका सुरात म्हणाले. ''धुमाळ सरां''चा तेवढ्यात कोणाच्या तरी लक्षात आले व त्याने सर आपण वर्गावरून गेलात तेव्हा कुलकर्णी सरांचा तास होता व ते लगेच आलेही !'' असे सांगितल्याने आम्ही बचावलो.

यातल्या गमतीच्या गोष्टी सोडल्या तरी, चंदू गोडबोले यांनी यांच्या लेखात म्हटले आहे तसे वर्गातला कोणीही काम वा नोकरी न मिळता किंवा उद्योगाशिवाय राहिला नाही. अनेकांनी आपापल्या क्षेत्रात नाव मिळवले. किमान पक्षी यश नक्की मिळवले. मी स्वत: ते काही घडलो, त्याचे श्रेय कोकणातल्या शिक्षक कै. लक्ष्मण बाबू निमणकर, पुण्याच्या रमणबागेतले कै. विजय हरी वाडेकर, कै. राजाभाऊ लवळेकर सर आणि मॉडर्न विद्यालयात संबंध आलेले. सर्व प्राध्यापक तसेच कर्मचारी व विद्यार्थी मित्र या सर्वांनाच देईन. ते नसते तर मी आज जो काही बनलो तेवढे बनणेही अशक्य होते.

ते मंतरलेले दिवस परत येणे शक्य नाही.

**सुरेशचंद्र पाध्ये**

---

**चांगला गुरू यशाचे दरवाजे उघडून देऊ शकतो**
**पण यशाच्या दिशेने जाण्यासाठी स्वत:लाच चालावे लागते.**

# Directory of students of Modern College (1970-74) Batch

## Jayant Prabhakar Abhyankar



601 Bhagyatara Society,
Patwardhan baug,
Erandwane Pune 411004.
Mob. 9822046643
jayantabhyankar@gmail.com

## Rajani Akut -Archana Jambli



1609, Sadashiv peth. Pune 411030
Mob. 9423009743

---

## Madhuri Arkatkar

Mob. 8080236879

## Sudhir Aphale

Mob. 9890901235

---

## Hemant P Beri



6 Shreyas Manikanchan 1000/1
Navi Peth
Mob. 9657716680
email - hemantberi@yahoo.com

## Charuchandra Bhide



Saritanagari Simhagad Road
Pune 411 030
charubhide@gmail.com

---

## Rajeev P Bodas



40/13 bhonde colony
Chaitanya app Deccan gymkhana
pune 411004
Mob. 98202 14950
rajeevbodas@rediffmail.com

## Madhuri Sanjeev Butala/Mehta



301, Dnyandeep Society,
Swanand Road no.1,
Sahakarnagar no.2,
Pune 411009.
Mob. 9890635126.
butalasanjeev@yahoo.com

---

## Pramod Ramkrishna Dabir



Flat no.3,Kakade Paradise,
Ashok path, off Law College Road,
Erandwane, Pune 411004.
Mob. 9850036580
dabirpramod@gmail.com

## Narahari Ganesh Deshpande



K-103 Samrajya Society
Balwantpuram Kothrud
Pune411038
Mob. 9975296453
ngd.pnb@gmail.com

---

## Sudhakar Dubal

Mob. 9822727857

## Madhav Deshpande



A-1603, Atalantis,
Main Street, Hiranandani Garden,
Powai, Mumbai 400076
Mob. 9869012036

## Bhalachandra Parameshwar Gade



762,Samrat Chowk,
Near ghumat ali road,
Bhuinj. Tal- Wai Dist- Satara.
Pincode no.-415515
Mobile no. 9096509701

## Shrikant Waman Gadre



1228, Sadashiv Peth,
Perugate Sahakari,
Kapil Sankalpa, Flat No. 401,
Pune 411030
Mob. 9422000101, 9673988008
shrikantgadre@gmail.com

---

## Alka Karve Ghatnekar



C-3 Rakshalekha So.
Pune 411030.
Mob. 7720082325

## Gajanan Giramkar

Mob. 9822538525

---

## Padma Ghodke (Nimhan)

Mob. 8600429999

## Chandrakant Godbole



1362, Sadashiv Peth,
Nava Vishnu Chowk,
Opp. Sajawat Furniture
Bajirao Road, Pune 411030
Mob. 9422316868

---

## Vasundhara Rajmachikar Gokhale



504A Shaniwar Peth,
Pune 411030
Mob. 9881993963.
ramagokhale100@gmail.com

## Lata Kuber Gurjar



A/24 Niramay Bunglow,
Nanmohan Co. Hsg. Society
Karvenagar Pune 411052
Mob. 9657712602.
gurjarlata2@gmail.com

---

## Ravindra Gurjar



A/24 Niramay Bunglow,
Manmohan Co Hsg. Soc,
Karvenagar Pune 411052
Mob. 9657712301.
ravindra.gurjar24@gmail.com

## Kanchan Haribhat (Mirge)

Mob. 9158537972

---

## Paras Jain



4, Chandra Appts,
1098/2A, Shivaji Nagar,
Model Colony, Pune 411016
Mob. 9822098850

## Surekha Tagare/ Jog



Plot no.57, Sargam Bunglow,
Shubhanagari Soc. Kothrud,
Pune 38.
Mob. 9922759277

### Jayashree Potbhare / Joshi



Shree Siddhanath Niwas
216, Sahakarnagar No. 2
Pune 411009
Mob. 9423075724 (W. A.) 7821884883
jayashreepotbhare@gmail.com

### Bhairvnath R. Kale



Bramha Suncity,
Flat No. A-2/601,
Wadgaonsheri, Pune 411014
Mob. 9822048761
brkagro@gmail.com

---

### Madhuri Karmalkar (Kulkarni)



D-10, Pashchimrang Soc.Phase 1,
Near Warjenaka, Warje,
Pune 411058
Mob. 996416951

### Pratibha Kanhere/ Hulyalkar



30 Janak House, Shaikh Misri Road
Wadala East Mumbai 400037
Mob. 9820601322
pratibhahulyalkar@yahoo.com

---

### Vasant S Kawade



3 A/ 401, Sorento , Shantipark ,
Shanti path , Ghatkopar (E),
Mumbai - 400077.
Mob. 9819227496

### Smita Joshi (Pushpalata Khire)



Nirman Parijat, Flat No. 17,
Shivshahi Colony,
Karve Nagar, Pune 411052.
Mob. 9763318117

---

### Baban B. Landge



402, Govinddham CHS Ltd.,
Plot No. 8, Union Park,
Chembur East, Mumbai 400071
Mob. 9967356102

### Pradip Lale



Plot No. 32, Kodilkar Colony,
Part -2, Talegaon, Near 32 Bunglow Soc.
Talegaon Dabhade - 410 506
Mob. 9881103603
pradeep.lale@gmail.com

---

### Shubhada Vasant Marathe (Sandhya Sathe)



B5-Flat no.601, Sarita Vaibhav,
Near Navashya Maruti,
Sinhagad Road,Pune 30.
Mob. 9028626050.

### Mahesh R Mehta



1195/7 Shivaji Nagar, Gopur Apartment,
Bafana Car Building, Ghole Road,
Pune 411-005
Mob 98220-27028

---

### Nitin Mitkar



71, Sairaj, Saptashrungi Colony,
Old Gangapur Naka, Gangapur Road,
Nashik 411013
Mob. 9822503507
mitkarnitin@gmail.com

### Ashok Bhaskar Mone



Saket Apartment, 45/1+2A
Karve Nagar Pune 411052
Mob 9823267502
abmone@rediffmail.com

## Hemant Morgaonkar



C- 10 Soba Sahavas Karve Nagar
Vithal Mandir Road Pune 411052.
Mob. 9225601967
hemant.morgaonkar@yahoo.in.

## Dilip Krishnarao Naik



B/1302.Amar serenity.
Opp. Kumar shanti niketan.
Wakeshwar road. Pashan,
Pune 411021.
Mob. 7798844666
dilip18@yahoo.com

---

## Shivaji D.Nimhan. Acp(rtd)



Parijat CHS 13th floor, flat no.132
R.C.Marg near Chembur Police Station
Chembur (East) Mumbai 400071.
E.mail: shivajinimhan.sn@gmail.com.

## Pophale

Mob. 9404268867

---

## Sureshchandra Padhye



4, Sharayu, Patrakar Nagar,
Off Senapati Bapat Road,
Pune 411016
Mob. 8888849519
padhyesureshchandra9@gmail.com

## Vishwas Balkrishna Patil



53/1.Sahajanand Soc.
B/H. Gandhi Bhavan.
Kotharud. Pune.411038
Mob. 9860009751

---

## Shobha (Loharikar) Potdar



1 Littles Brook Ct. Burlington
MA 01803 U S A
Mob. +1 857 756 5317
shobhavpotdar@gmail.com

## Ranjana (Pikle) Kasbekar



1502/D Palm Drive Emaar
Golf Course Extension Road
Sec 66 Gurugram 122001
rvkasbekar@ yahoo.co.in
Mob. 9871710440

---

## Jayant Patwardhan



Sharda Ganesh Complex,
Near Madai Ganptai Temple,
59, Shukrawar Peth, Pune 411002
Mob. 976646248

## Aparna Khandekar (Pratibha Puranik)



Shri Suvarna Ratna Gardens,
B-1-302, Karvenagar,
Pune 411052
Mob. 9403186437

---

## Abhay Janardan Ratnaparkhi



48/17 Bungalow Ex Service Men Colony,
Near More Vidyalaya.
Paud Rd Pune 38
Mobile 9850257344.
abhayparkhi14@gmail.com

## Dilip Raisoni

Mob. 9370105477

## Sharad Vinayak Rayrikar



335 Shaniwar Peth,
Shreepal Plaza Building
6th Floor Ramanbaug Shalejawal,
Pune 30
9765490434
sayalirayrikar@gmail.com

## Vidhyadhar Rajpathak

Mob. 9545896258

---

## Ravindra Salvekar



341, Narayan Peth,
Kamal Kunj, Near Modi Ganpati,
Pune 411030
Mob. 8329346883

## Ashok Sarmukadam



Mob. 9423004668
ashoksarmukadam@gmail.com

---

## Shirish Atmaram Sardesai



Flat no 9, Sarojini Apartment,
Tulshibagwale Colony,
Sahakarnagar no 2,
Pune 411009
Mobile no 9822499063
shirishsardesai@hotmail.com

## Rajeev Shende



Ramkali1161/3 Gharpure Colony.
Shivaji Nagar Pune - 411005
Mob. 9822324476
rgshende.kh@gmail.com

---

## Eknath Shirke



B 201, Silvenest,
JSPM College Road,
Narhe, Pune 411041
Mob. 9370198872
nath1952.es@gmail.com

## Pravin Shah

Mob. 9421975262

---

## Suhas Shah



B/4 Vikas Complex, LBS Marg,
Thane
Mob. 9320882883
suhasshah11@gmail.com

## Shamkant Sutar



500/1, Shaniwar Peth,
Joshi Sankul, Mehunpura,
Pune 411030
Mob. 9881152902
shamkantssutar@gmail.com

---

## Pradeep Thatte



602 Pramod Vihar 6th Floor
Walvekar Nagar Aranyeshvar
Pune 411009.
Mob. 7447494227
thattegraphicss@gmail.com.

## Mr. Prakash M Vidwat



"PRASAD" Plot No.53, Sector No. 18,
PCNTDA, Shivaji Park,
Chinchwad (E) Pune -411019
Mob. 9922440530E-
pmvidwat@gmail.com

## Sham Wagh



8 Laxmi Apartments,
Lane 6 Prabhat Road,
Pune 411004
Mob. 9822027096
sham.wagh@gmail.com

## V.B.Wagh



S. No. 27 Plot No.19.
Yashkamal Society.
Near Kothrud Bus Stand.
Kothrud. Pune 411038.
Mob.9881007978.
vighnaharwagh@gmail.com.

---

## Surekha Walvekar- Mengji.



Samartha Deep, B Wing,
Andheri, West Oshiwara,
Mumbai 400053
Mob.  9769638038.

## Dilip Baburao Zende



A3/31 Kailas (A) Co-Operative
Housing Society Limited,
Near Sangam Tarun Mandal,
Shastri Nagar, Kothrud, Pune 411038.
Mob. 9422028817, 7559140855
dilipzende1951@gmail.com

---

## List of Students T.Y.B.Com. (1970-74)

| | | | |
|---|---|---|---|
| Shri. Abhyankar J.P. | Shri. Gade B.P. | Miss Kulkarni V.S. | Shri. Pharate C.A. |
| Miss. Akut R.V. | Shri. Gadiya S.V. | Shri. Kandarap S.D. | Miss Pitale R.M. |
| Shri. Aphale R.B. | Shri. Ghodke D.M. | Shri. Kunjeer U.V. | Shri. Ponkohe S.N. |
| Miss. Arootkar M.S. | Miss. Godkhe P.M. | Shri. Lale P.J. | Shri. Potdar V.R. |
| Shri. Arole P.D. | Shri. Ghumare K.V. | Shri. Landge B.B. | Shri. Puntambekar V.A. |
| Shri. Aslekar V.M. | Shri. Giramkar G.V. | Miss Loharikar S.W. | Miss Rajmachikar V.N. |
| Shri. Baride A.M. | Miss. Godbole A.S. | Shri. Lokhande A.Y. | Shri. Sardesai S.A. |
| Shri. Barve D.S. | Shri. Godbole C.M. | Shri. Mahadik U.V. | Shri. Sarmukadam A.S. |
| Shri. Bedkar H.S. | Shri. Godbole P.T. | Shri. Mangale P.D. | Miss Sathe S.S. |
| Miss. Bendre R.R. | Shri. Gurjar R.G. | Shri. Mantri D.M. | Shri. Salve S.S. |
| Shri. Bhalerao M.M. | Miss. Haribat K.R. | Miss Marathe A.S. | Miss Sawant R.S. |
| Shri. Beri H.P. | Shri. Itraj J. P. | Miss Mehta M.M. | Shri. Shah A.R. |
| Miss. Biwalkar N.S. | Shri. Jagtap A.B. | Shri. Mone A.B. | Shri. Shah G.R. |
| Shri. Bodas R.P. | Shri. Jain P.N. | Shri. More D.N. | Shri. Shah P.S. |
| Shri. Bokil D.K. | Miss. Jog M.R. | Shri. Morgankar H.C. | Shri. Shah S.K. |
| Shri. Borana V.D. | Miss. Joshi A.M. | Shri. Mutha A.Z. | Shri. Shelke S.P. |
| Shri. Borhade C.L. | Miss. Joshi J.G. | Shri. Naik D.K. | Shri. Shende R.G. |
| Shri. Buksbete V.T. | Miss. Joshi K.M. | Shri. Naik S.D. | Shri. Shinde V.P. |
| Miss. Chitnis M.V. | Shri Joshi M.M. | Shri. Nalawade S.G. | Shri. Shirke E.R. |
| Shri. Dabir V.Y. | Shri. Joshi P.P. | Shri. Nimhan S.D. | Shri. Shinde--- |
| Shri. Dabir P.R. | Shri. Joshi S.R. | Shri. Ogle A.S. | Shri. Saoon A.T. |
| Shri. Desai P.V. | Shri. Joshi S.S. | Shri. Padhye S.D. | Shri. Takawale S.J. |
| Shri. Deshpande A.N. | Shri. Kale B.R. | Shri. Padhye S.S. | Shri. Tapare R.K. |
| Shri. Deshpande K.D. | Shri. Kale G.N. | Shri. Panse L.M. | Miss Thakar R.V. |
| Shri. Deshpande M.D. | Miss. Kanhere P.B. | Shri. Paranjape S.S. | Shri. Tharwal M.D. |
| Shri. Deshpande N.G. | Shri. Karandikar S.R. | Shri. Pashankar A.D. | Shri. Vaghle S.L. |
| Shri. Deshpande S.M. | Miss. Karve A.V. | Shri. Kulkarni Y.S. | Shri. Vidwat P.M. |
| Shri. Dhadve P.L. | Shri. Kedari S.S. | Shri. Pathak J.M. | Shri. Wagh S.S. |
| Miss. Dongade N.S. | Shri. Khare S.B. | Shri. Patil A.D. | Shri. Wagh V.B. |
| Miss. Divekar N.J. | Miss Kuber L.T. | Shri. Patil N.M. | Miss Walvekar S.H. |
| Shri. Dubal S.P. | Miss Kulkarni J.M. | Shri. Patil S.G. | Miss Wartikar S.J. |
| Shri. Dhansalkar R.S. | Miss Kulkarni M.A. | Shri. Patil V.B. | Shri. Zende D.B. |

# ऋणनिर्देश

ह्या स्मरणिकेची निर्मिती करताना व आपले सुवर्ण महोत्सवी
स्नेहसंमेलन आयोजित करताना अनेक मान्यवर आणि
शुभचिंतकांचे अपार सहकार्य लाभले. त्या सर्वांचा ऋणनिर्देश
करणे शक्य नाही.
तरीही मॉडर्न कॉलेज शिवाजीनगरचे प्राचार्य
डॉ. झुंजारराव, उपप्राचार्य डॉ. कांबळे यांचे
सहकार्याशिवाय आपला समारंभ शक्यच नव्हता.
आपले सर्व मित्रमंडळी ज्यांनी सढळ हाताने
स्पॉन्सरशिप्स दिल्या.
श्री. रमाकांत धानोकर व त्यांचे सहकारी ज्यांनी
स्मरणिकेची सजावट व सुबक छपाईचे सुंदर काम केले.
यांचा नामनिर्देश आवश्यकच आहे.



गत अर्ध शतकामध्ये
आपल्याला सोडून गेलेल्या
सर्व गुरूजन आणि स्नेही
यांना आमची आदरयुक्त
श्रध्दांजली